अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १ ऑक्टोबर २०२४ । वर्ष : २३ वे अंक : ४ था किंमत : ५ रुपये पाने ८




## मासे पकडण्यासाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू



**मोहोळ** : सीना नदी पात्रात मासे पकडण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पाय घसरून बुडून मृत्यू झाला. ही घटना मोहोळ तालुक्यातील आष्टे बंधाऱ्याजवळ घडली. मोहोळ रेल्वे स्टेशन येथे नंदकुमार जवंजाळ हा तरुण राहतो. शनिवारी दुपारी अकराच्या दरम्यान आष्टे येथील बंधाऱ्यावर नंदकुमार हा मासे पकडण्यासाठी गेला होता. सीना नदीच्या पात्रालगत बसून मासे पकडत असताना त्याचा पाय घसरून तो पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत गेला. रविवारी सकाळी शिरापूर बंधाऱ्यालगत त्याचा मृतदेह मिळून आला. भाऊ आनंद जवंजाळ याने याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. तपास पो.कॉ. सागर शिंदे करीत आहेत.

# बबनदादा शिंदे तिसऱ्यांदा पवारांच्या भेटीला
# जिल्ह्यात राजकारणाचा नवा अंक बघायला मिळणार

## ▶▶ राजन पाटलांनीही घेतली होती भेट ▶▶ अनेक नेते तुतारीच्या संपर्कात

**सोलापूर/प्रतिनिधी**

मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांनी ज्येष्ठ नेते शरद पवारांची भेट घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सोमवारी माढ्याचे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार बबनदादा शिंदेंनी शरद पवारांची पुण्याच्या मोदी बागेत भेट घेतली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीतून लढण्यापेक्षा त्यांची शरद पवारांच्या तुतारी चिन्हावर लढण्याची इच्छा असल्याची चर्चा आहे. बबनदादांशिवाय आणखी दोन नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाण्यासाठी इच्छुक आहेत. त्यामुळे आगामी काळात जिल्ह्यात राजकारणाचा नवा अंक बघायला मिळण्याची शक्यता आहे.





राज्याच्या विधानसभा निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतशा राजकिय वर्तुळातही हालचालींना वेग आला आहे. अशातच राजकिय वर्तुळातून एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या गटाचे आमदार बबनदादा शिंदे यांनी शरद पवार यांची सोमवारी भेट घेतली. या भेटीनंतर राजकिय चर्चांना उधाण आले आहे. गेल्या काही दिवसांत बबनदादा शिंदे यांनी तिसऱ्यांदा शरद पवार यांची भेट घेतल्याने ते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी प्रवेश करणार, असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

बबनदादा शिंदे हे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणातील बडे प्रस्थ मानले जातात. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर बबनदादा शिंदे हेदेखील अजित पवार यांच्यासोबत गेले. पण विधानसभा निवडणुका जसजशा जवळ येऊ लागल्या आहे तसतशा राज्यातील नेत्यांची नाराजीही समोर येऊ लागली आहे. अनेकजण घरवापसीसाठी प्रयत्न करत असल्याचे सांगितले जात आहे.

### माढ्यात इच्छुकांची संख्या वाढली

बबनराव शिंदे यांनी आपले चिरंजीव रणजितसिंह शिंदे हे निवडणूक लढतील असे संकेत दिले आहे. दुसरीकडे त्यांचे पुतणे धनंजय शिंदे यांनीही माढ्यातून दंड थोपटले आहेत. अभिजित पाटील हेदेखील माढ्यातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. याशिवाय काँग्रेसकडून मिनल साठे याही या मतदारसंघावर दावा करत आहेत. तर मोहिते-पाटील घराण्यातील एक नेताही येथून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहे. माढा मतदारसंघात इच्छुकांची संख्या वाढली आहे.

### ... तर अभिजित पाटील महायुतीकडून लढणार

महायुतीकडून ही जागा अजितदादांच्या राष्ट्रवादीकडे आहे. तेथून दादा रणजितसिंह शिंदे यांना उमेदवारी देण्याच्या विचारात आहेत. तसे झाल्यास अभिजित पाटील हातात तुतारी घेण्याची शक्यता आहे. जर बबनदादा यांनी शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला तर अभिजित पाटील महायुतीकडून निवडणूक लढण्याची शक्यता आहे.

### मोहिते-पाटलांची भूमिका महत्वाची

जिल्ह्यात मोहिते-पाटील आणि शिंदे बंधू यांचे राजकीय वैर सर्वश्रृत आहे. शिंदे यांच्यामुळेच मोहिते पाटलांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर राज्यातील राजकीय घडामोडीनंतर शिंदे बंधू शरद पवारांपासून लांब गेले तर मोहिते-पाटील पवारांसोबत आले. आता पुन्हा शिंदे घराणे शरद पवारांसोबत येत असल्यास मोहिते-पाटलांची भूमिका महत्वाची भूमिका राहणार आहे.

गेल्या काही दिवसांत बबनराव शिंदे यांनी दोनदा शरद पवार यांची भेट घेतली होती.

मुलगा रणजितसिंह शिंदे यांच्यासोबत पुण्यात आणि त्यानंतर वसंतदादा इन्स्टिट्यूट येथे दुसऱ्यांदा भेट घेतली होती. त्यानंतर सोमवारी तिसऱ्यांदा त्यांनी अचानक शरद पवार यांची पुण्यातील त्यांच्या मोदी बागेतील निवासस्थानी जाऊन भेट घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी माढा विधानसभा मतदारसंघातून बबनदादा शिंदेंचे चिरंजीव रणजितसिंह शिंदे हे निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. आपल्या मुलाचा राजकिय प्रवास विना अडथळा सुरू होण्यासाठी आमदार बबनदादांनी शरद पवारांची भेट तर घेतली नाही ना अशा चर्चा सुरू आहेत. तसेच ते राष्ट्रवादीत प्रवेश करत तुतारी फुंकणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. बबनराव शिंदेंनी शरद पवार गटात प्रवेश केलातर हा अजित पवारांसाठी मोठा धक्का असणार आहे.

## बसस्थानकावर प्रवाशांचे दागिने अन् पैसे चोरणारी महिला अटकेत

**तीन गुन्हे उघड; १ लाख ८० हजारांचे दागिने जप्त**

**सोलापूर/प्रतिनिधी**



ग्रामीण भागामध्ये काही दिवसांपासून बसस्थानकामध्ये प्रवाशांचे दागिने व पाकिटे चोरण्याचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे स्थानिक गुन्हेशाखेचे पो.नि. सुरेश निंबाळकर यांनी आपल्या अधिकाऱ्यांना गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हेशाखेच्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सापळा रचून आरोपी उषा अशोक सांगळे (वय ३५ रा. सोनारी, ता.परांडा जि. उस्मानाबाद) हिला अटक केली. व तिच्याकडून चोरींचे ३ गुन्हे उघडकिस आणून एक लाख ८० हजारांचे सोन्याचे दागिने जप्त केले.

बसस्थानकावरील चोरींचे प्रमाण रोखण्यासाठी पो.नि. निंबाळकर यांनी वेगवेगळी पथके तयार केली होती. त्याप्रमाणे स.पो.नि. नागनाथ खुणे व त्यांचे पथक रेकॉर्ड वरील आरोपींचा शोध घेण्यासाठी (कुर्डूवाडी, ता. माढा) येथे हजर असताना हवालदार आबासाहेब मुंडे यांना खबऱ्याकडून बातमी मिळाली. सोनारी गावची एक महिला जिल्ह्यातील वेगवेगळ्या बसस्थानकावर जावून प्रवाशांचे दागिने व पाकिटे चोरते. ती महिला सध्या कुर्डूवाडी येथे चोरी करण्याच्या तयारीत असल्याची बातमी मिळताच स्थानिक गुन्हेशाखेचे पथक कुर्डूवाडी बसस्थानकावर गेले. पोलिस कॉन्स्टेबल मोहिनी भोगे यांनी त्या महिलेस ताब्यात घेतले. पोलिसांना तिने आपले नाव विचारले उषा अशोक सांगळे असे सांगितले. ही कामगिरी स्थानिक गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, फौजदार म.इसाक मुजावर, निलकंठ जाधवर, हवालदार आबासाहेब मुंडे, धनाजी गाडे, मोहिनी भोगे, पोलिस कॉन्स्टेबल सागर ढोरे, अक्षय डोंगरे, चालक समीर शेख यांनी पार पाडली.

### कुर्डूवाडी, अकलूज पोलिस ठाण्यातील गुन्हे उघडकीस

पोलिसांनी महिलेकडे सखोल चौकशी केली असता तिने चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. यावेळी पोलिसांनी आरोपी उषाकडून कुर्डूवाडी पोलिस ठाण्यात दोन व अकलूज पोलिस ठाण्यातील एक असे तीन गुन्हे उघडकीस आणले. तिच्याकडून १ लाख ८० हजाराचे सोन्याचे दागिने जप्त केले.

## ब्लॅकमेल केल्याने तरुणाने केली आत्महत्या

**विवाहितेवर गुन्हा दाखल; नांदणी येथील घटना**

**सोलापूर** : माझ्यासोबत यापुढेही प्रेम संबंध ठेव, नाहीतर तुझ्या विरुद्ध खोटा गुन्हा दाखल करते अशी धमकी देऊन एका महिलेने १ लाख रुपयांची मागणी केली. तिच्या त्रासाला कंटाळून आपल्या तरुण मुलाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना नांदणी (ता.दक्षिण सोलापूर) येथे २३ सप्टेंबर रोजी दुपारी घडली होती.

रेवणय्या उर्फ प्रशांत दयानंद स्वामी (वय २०, रा.नांदणी) असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या वडिलांनी नुकतीच मंद्रूप पोलिसात फिर्यादी दाखल केली. पोलिसांनी गावातील एका विवाहित महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.

मयत रेवणय्या उर्फ प्रशांत स्वामी याच्या वडिलांचे गावात किराणा दुकान आहे. तो किराणा दुकानात बसत होता. त्याचे एका विवाहितेसोबत प्रेम संबंध जुडले होते.काही दिवसांपासून प्रशांत हा तिच्याशी बोलणे टाळत होता. त्या महिलेने मयत प्रशांतला १ लाख रुपयाची मागणी करत माझ्यासोबत यापुढेही असेच प्रेम संबंध ठेव,नाही तर तुझ्यावर पोलिसात खोटा गुन्हा दाखल करते, अशी धमकी तिने दिली होती. तिच्या त्रासाला कंटाळून प्रशांतने आत्महत्या केली, अशा आशयाची फिर्याद मयताचे वडील दयानंद स्वामी यांनी पोलिसात दाखल केली. तपास फौजदार डांगे करीत आहेत.

## बाणेगाव येथील विहिरीत वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

**सोलापूर** : बाणेगाव (ता. उत्तर सोलापूर) येथील स्वतःच्या शेतातील विहिरीत पडल्याने सुभाष तिपण्णा तोडकर (वय ८०) हे मयत झाले. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास उघडकिस आली. सुभाष तोडकर हे रविवारी सायंकाळी घरातून गेले होते. आज दुपारी ४ वाजेच्या सुमारास त्यांचा मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण अद्याप समजले नाही.

## गिरणीची आग विझवताना मालकाचा मृत्यू

**सोलापूर** : पहाटेच्या सुमारास शॉर्ट सर्किटने पिठाच्या गिरणीला आग लागली. ती आग विझवताना ५० वर्षीय गिरणींचे मालक भाजून मयत झाले. ही घटना खुदावाडी (ता.तुळजापूर) येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली. दिंगबर नागप्पा कापसे (वय ५० रा. खुदावाडी (ता.तुळजापूर) असे मयताचे नाव आहे. कापसे कुटूंबिय झोपेत होते. पहाटेच्या सुमारास त्यांच्या घराशेजारी असलेल्या पिठाच्या गिरणीला आग लागली. त्यावेळी ते गिरणीत जाऊन आग शमविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांच्या अंगावरील कपड्याने पेट घेऊन ते गंभीर भाजले होते. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात पवनदीप (मुलगा) त्यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान ते झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे.या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हील पोलीस चौकित झाली आहे.

## वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह कर्नाटकात सापडला




**अकल्लकोट** : आळगे (ता. अक्कलकोट) येथील बंधाऱ्यावरून महाराष्ट्र हद्दीतून कर्नाटकात मोटारसायकल घेऊन जाणारा एक तरुण भीमा नदीच्या पाण्यात वाहवून गेला. ही घटना दि.२८ सप्टेंबर रोजी घडली होती. त्या मृतदेह सोमवारी दुपारी सुमारास अफझलपूर (कर्नाटक) जवळ सापडले. अल्ताफ सैपन तांबोळी (रा. हैद्रा, ता. अक्कलकोट) असे त्या तरूणाचे नाव आहे.

अल्ताफ आणची (ता.चडचण, कर्नाटक) येथे राहत होता. महाराष्ट्रात तो काही कामानिमित्त आला होता. परत जाताना आळगे येथील बंधाऱ्यावरून दोन फूट पाणी वाहत होते. तो मोटारसायकल बंधाऱ्यावरून घेऊन चालत जात होता. अचानकपणे गाडी चालू झाली आणि हातातून निसटली. गाडी पकडण्यासाठी जात असताना तो वेगाने वाहणाऱ्या पाण्यात बेपत्ता झाला होता. त्याचा मृतदेह सोमवारी सापडला. त्याच्या पश्चात पत्नी, आई, भाऊ असा परिवार आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुझ्या गळा, माझ्या गळा गुंफू मोत्यांच्या माळा!!!

कल्याण
134-85-230

मुंबई
347-43-157

**जिल्हा दूध संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा**

## कारभार पेलवत नसेल तर प्रशासक नेमा; सभासदांची मागणी

**सोलापूर/प्रतिनिधी**

संचालकांना सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाचा कारभार केला नसेल तर संघावर प्रशासकाची नेमणूक करा अशी मागणी सभासद, संस्था प्रतिनिधींनी केली आहे. प्रशासकाच्या कालावधीत संघावर पाच कोटींचा बोजा चढला, त्यांच्या चुकीमुळेच मुंबई येथील जागा विक्री करण्यास अडचण येत आहे, असा दावा करत संचालक मंडळांनी ही मागणी फेटाळली.

सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सभागृहात पार पडली. या सभेला संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे व उपाध्यक्ष दीपक माळी यांच्यासह नऊ संचालक अनुपस्थित होते. आठ संचालकाच्या उपस्थितीत ही सभा पार पडली. ज्येष्ठ संचालक औदुंबर वाडदेकर हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी वाडदेकर यांनी सध्या संस्था प्रचंड आर्थिक अडचणीला तोंड देत असून संस्थेला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी संचालक मंडळ सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची ग्वाही दिली. या सभेला जेष्ठ माजी संचालक राजेंद्रसिंह भोसले, संचालक -मारुती लवटे, विजय येलपले, शंभुराजे मोरे, राजेंद्र मोरे, बाळासाहेब माळी, मनोज गरड , अशोक पाटील, तज्ज्ञ संचालक मारुती ढाळे आदी उपस्थित होते.

### सभासदांनी केल्या या मागण्या

करमाळा येथील विलास जाधव या संस्थाचालकाने संघावर प्रशासकाची नेमणूक करा अशी मागणी केली. डिकसळ येथील संस्थाचालक भाऊसाहेब धावणे यांनी ताळेबंद पत्रक न देता सभा कशी बोलावली याबद्दल जाब विचारत टँकर घोटाळ्याबाबत सभासदांना खरी माहिती देण्याचे आवाहन केले. अनिल अवताडे यांनी प्रशासकाच्या काळापेक्षा संचालक मंडळाच्या कालावधीत संघास २२ कोटी कर्ज कसे वाढले याबाबतची विचारणा केली.

### संचालक मंडळांनी मागणी फेटाळली

**अध्यक्ष, उपाध्यक्षांसह नऊ संचालक अनुपस्थित**

जिल्हा दूध संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला काही अपरिहार्य कारणामुळे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे उपस्थित राहिले नसल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर उपाध्यक्ष दीपक माळी ही अनुपस्थित होते. यांच्यासह योगेश सोपल बबनराव अवताडे , महिला संचालक अलका चौगुले,निर्मला काकडे, वैशाली शेंबडे, छाया ढेकणे, तज्ज्ञ संचालक सुरेश हसापुरे हे अनुपस्थित होते. मात्र अशा आणीबाणीच्या स्थितीत जेष्ठ संचालक औदुंबर वाडदेकर यांनी अध्यक्ष पद भूषवत सर्वसाधारण सभा निर्विघ्न पार पाडली. संचालक शंभूराजे मोरे यांनीही संचालक मंडळाची बाजू सावरण्याचा प्रयत्न केला.



सोलापूर : जिल्हा दूध संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व्यासपिठावर ज्येष्ठ संचालक औदुंबर वाडदेकर व इतर.

# हे तर चराऊ कुरणच

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून नवनवीन योजना जाहीर केल्या जात असल्याने शासकीय तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडत आहे. या कारणास्तव नवीन जिल्हा क्रीडा संकुले उभारण्यासाठी क्रीडा विभागाने सादर केलेल्या एक हजार ७८१ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावावर वित्त विभागाने विरोध करूनही सरकारने प्रशासकीय मंजुरी दिली गेली. राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेसाठी सरकारला दरवर्षी किमान ४६ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार उचलावा लागणार आहे. त्याचप्रमाणे सरकारने अन्नपूर्णा योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी तीन सिलिंडर मोफत देण्याचे तसेच मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर नवीन क्रीडा संकुलांच्या सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास वित्त विभागाने विरोध केला होता. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याची वित्तीय तूट एक लाख ९९ हजार १२५.८७ कोटी रुपयांवर पोचली आहे. मोठ्या प्रमाणावर सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्या आणि अंतरिम अर्थसंकल्पामुळे ही वित्तीय तूट वाढली आहे. महसुली तूट ३ टक्क्यांवर पोचली आहे. महसुली तूट, राजकोषीय जबाबदाऱ्या आणि सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या नवनवीन योजना यांमुळे आर्थिक भार वाढला आहे. अशा परिस्थितीत कोणतीही नवीन जबाबदारी स्वीकारू शकत नसल्याचे वित्त विभागाने या प्रस्तावावरील टिप्पणीत नमूद केले आहे. राज्य क्रीडा विकास समितीने क्रीडा धोरणाचे उल्लंघन करून तसेच वितरित केलेल्या निधीपेक्षा अधिक निधीच्या क्रीडा संकुलाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून हा आर्थिक बेशिस्तीचा प्रकार असल्याचे टिप्पणीत म्हटले आहे. नियोजन विभागाकडूनही याला आक्षेप घेण्यात



आला आहे. सरकारच्या पायाभूत सुविधा विकास धोरणानुसार खेळाशी संबंधित सुविधा निर्माण करण्यासाठी बांधकाम सुरू झाले नाही, अशा क्रीडासंकुलांसाठी सुधारित प्रशासकीय मंजुरी घ्यायची असेल, तर तालुकास्तरावर ५ कोटी रुपये, जिल्हास्तरावर २५ कोटी रुपये तर विभागीय स्तरावर ५० कोटींपर्यंतच्या निधीची मर्यादा घालण्यात आली आहे. जर क्रीडासंकुल सुरू झाले असेल, तर तालुका स्तरावर ३ कोटी, जिल्हा स्तरावर १५ कोटी तर विभागीय स्तरावर ३० कोटींपर्यंतच्या निधीची मर्यादा घालण्यात आली आहे. याविषयीचा शासन निर्णय २३ मार्च २०२२ रोजीच काढण्यात आला आहे. क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली २६ मार्च २०२३ रोजी स्थापन करण्यात आलेल्या समितीला क्रीडा धोरणाच्या पलीकडे जाऊन तसेच मंजूर निधीपेक्षा अधिकच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार दिले आहेत. या समितीने हा क्रीडा संकुलांचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवला. त्यानुसार शुक्रवारी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये १५५.२६ कोटींचा सुधारीत प्रशासकीय मंजुरीचा प्रस्ताव, त्याचप्रमाणे नऊ क्रीडा संकुलांच्या १८४.४२ कोटींच्या सुधारीत प्रशासकीय मंजुरीच्या धोरणबाह्य प्रस्तावाला तर १४१ क्रीडा संकुलांच्या १४४१.३८ कोटींच्या सुधारित प्रशासकीय मंजुरीच्या धोरणबाह्य प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.विरोधी पक्षाने तसेच नियोजन विभागाने हरकत घेतल्यानंतर सरकारने त्यांचा विचार करायला हवा होता. राज्याच्या तिजोरीवर इतका ताण पडणे सामान्यांसाठी चांगले नाही. सरकार कुठल्याही पक्षाचे असो.राज्यावरील कर्जाचा विचार करत नाही. योजनांना आणि सवलतींना पैसा कमी पडला तर सरकार कर्ज करायला हयगय करत नाही. काँग्रेसवालेही तेच केले असते. लाडक्या बहीण योजनेमुळे राज्याची अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे. अर्जांची संख्या वाढत चालली आहे. तेव्हा वाढीव रक्कम कोठून जमा करणार हा खरा प्रश्न आहे. आज राज्यात बहुतांशी जिल्ह्यात क्रीडा संकुले उभी आहेत पण त्यांची काय अवस्था आहे हे सरकारने पहिल्यांदा पाहिले पाहिजे. सरकार कोट्यवधी रुपये देते पण त्याचा विनियोग व्यवस्थित होत नाही. आजही अनेक संकुलांमध्ये कुठल्याही सुविधा नाहीत. खेळाडू तयार व्हावेत म्हणून क्रीडा कार्यालये प्रयत्न होतच नाहीत. त्यात पुन्हा निधी मंजूर करणे म्हणजे सरकारी बाबू आणि मंत्री-लोकप्रतिनिधी यांच्यासाठी चराऊ कुरणच ठरणार आहे.

---

**सामाजिक**

▶▶ ऑनलाईन गेमिंगच्या आड वाढणारी

# सट्टेबाजी : एक गंभीर समस्या

**आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन गेमिंगची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे लोकांनी वेळ घालवण्यासाठी आणि मनोरंजनासाठी ऑनलाइन गेम खेळण्यास सुरुवात केली आहे. परंतु या मनोरंजनाच्या माध्यमातून एका मोठ्या आणि धोकादायक समस्येची सुरुवात झाली आहे-ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली सट्टेबाजी आणि जुगार वाढीस लागला आहे.**

ऑनलाइन गेमिंगच्या आड सुरू असलेल्या सट्टेबाजीच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. अशा प्रकारच्या सट्टेबाजांमुळे अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. सट्टेबाजी ही काही केवळ वैयक्तिक पातळीवरील समस्या नाही, तर ती देशाच्या आर्थिक स्थिरतेलाही धोका निर्माण करत आहे. अलीकडेच प्रवर्तन निदेशालयाने (ईडी) केलेल्या कारवाईतून चीनच्या एका गेमिंग ॲपच्या माध्यमातून भारतातून ४०० कोटी रुपये चीनला पाठवले गेल्याचे उघड झाले आहे.

या प्रकरणात तीन चीनी नागरिकांच्या क्रिप्टो अकाउंट्स गोठवून २५ कोटी रुपयांची जप्ती केली गेली आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेला अशा प्रकारच्या सट्टेबाजांनी कमजोर करण्याचे हे प्रकार अत्यंत चिंताजनक आहेत.

ऑनलाइन गेमिंग आणि ऑनलाइन सट्टेबाजी यांच्यामध्ये एक अत्यंत बारीक रेषा आहे. साधारणपणे मनोरंजनासाठी खेळले जाणारे गेम कधी जुगारात रूपांतर होतात, हे खेळणाऱ्या व्यक्तीला कळतही नाही.

सुरुवातीला साधे वाटणारे खेळ नंतर सट्टेबाजीचा आधार बनतात. अनेक वेळा लोकांच्या उत्साहाचा फायदा घेऊन त्यांना ऑनलाइन गेमिंगच्या व्यसनात ओढले जाते, ज्यामुळे ते कर्जात बुडतात आणि शेवटी आर्थिक संकटात अडकतात.

सध्या अनेक उदाहरणे समोर येत आहेत ज्यात लोक ऑनलाइन गेमिंगमुळे कर्जबाजारी झाले आहेत. जेईई परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या एका विद्यार्थ्याने ऑनलाइन गेमिंगच्या व्यसनामुळे तब्बल ९६ लाख रुपयांचे कर्ज घेतल्याचे प्रकरण चर्चेत आले होते. तसेच, उन्नावमधील एका पोलीस कॉन्स्टेबलने ऑनलाइन गेमिंगमुळे १५ लाख रुपयांचे



कर्ज घेतले आणि त्याने आत्महत्येची धमकी दिली. हे केवळ काही उदाहरणे आहेत, पण अशा प्रकारच्या घटना समाजात व्यापक प्रमाणात घडत आहेत.

या समस्येचा एक दुसरा पैलू म्हणजे सेलिब्रिटींचा चुकीचा प्रचार. अनेक नामांकित सेलिब्रिटी पैसे मिळवण्यासाठी अशा ऑनलाइन गेमिंग ॲप्सचा जाहिरातीतून प्रचार करतात. त्यामुळे त्यांचे अनुकरण करणाऱ्या तरुण पिढीला हे खेळ खेळण्याची प्रेरणा मिळते, आणि ते नकळत या जुगाराच्या जाळ्यात अडकतात. सेलिब्रिटींच्या अशा जबाबदारीशून्य वागण्यामुळे समस्या अधिक गंभीर होत आहे.

या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने ऑनलाइन गेमिंगवर मोठा कर लावला आहे, तरीदेखील ऑनलाइन गेमिंगमधून सरकारला मिळणारा जीएसटी संकलन प्रचंड वाढला आहे. गेल्या सहा महिन्यांत जीएसटी संकलनात ४१२% वाढ झाली आहे, परंतु याचसोबत लोकांचे आर्थिक नुकसानही वाढत आहे.

आर्थिक फायद्याच्या आशेने चालणाऱ्या या जुगाराच्या जाळ्यामुळे अनेक लोक कर्जबाजारी होऊन आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयांपर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे या समस्येवर त्वरित उपाययोजना करणं अत्यावश्यक आहे.

ऑनलाइन गेमिंग आणि सट्टेबाजी यांच्यातील बारीक रेषा ओळखणे महत्त्वाचे आहे. सरकारने कठोर पावले उचलून या सट्टेबाजांवर निर्बंध लावले पाहिजेत. तसेच, लोकांनी देखील सजग राहून आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. ऑनलाइन गेमिंग हे मनोरंजन असले पाहिजे, आर्थिक धोक्याचे साधन नव्हे.

**- मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली.

---

**टुडेज् ब्लॉग**

# सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि मनपा आयुक्तांचे जाहीर अभिनंदन

सोलापुरातील होटगी रोड येथील विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्यासाठी विमानतळ सक्षम करण्याच्या कामाचे संपूर्ण श्रेय सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनाच द्यावे लागेल. प्रथमतः सदर विमान सेवेस अडथळा आणणारी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची राजकीय पाठबळावर उभी असलेली चिमणी पाडण्याचे धाडस आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले. त्यांना राजकीय संरक्षण असल्याशिवाय ते हे करणार नाहीत. हे जितके खरे आहे तितकेच हे करण्याची धमक त्यांच्या अंगात होती व आहे, म्हणून हे त्या करू शकल्या, हे त्याहून अधिक खरे आहे. म्हणूनच सोलापूर महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांना या विमानतळाच्या कार्यातील श्रेय दिले पाहिजे.

चिमणीच्या पतनानंतर सोलापूरचे जिल्हाधिकारी यांनी ज्या पद्धतीने, श्रद्धेने आणि निष्ठेने हे विमानतळ विमान सेवेसाठी सक्षम करण्याचे काम केले ते जाहीर कौतुकास पात्र आहेत. कोणा आमदाराने काय मदत केली, हे दुय्यम आहे. कारण या कार्याला सुरुवात झाली ती जनरेट्यामुळे. सामान्यातील सामान्य माणसापर्यंत जेंव्हा चिमणीच्या कथा पोचल्या, तेंव्हा क्षोभ-प्रक्षोभ निर्माण झालेला होता. तो सगळ्यांनाच चटके देऊन जात होता. एकाही राजकारण्याच्या अंगात हिम्मत नव्हती पुढे येऊन काय आहे ते स्पष्टपणे सांगण्याची. चिमणी कशी उभी राहिली, कोणामुळे उभी राहिली आणि तिला संरक्षण कोणाचे होते, हे जगजाहीर होते. सामान्य लोकांनी





त्याचा गवगवा केल्यानंतर हळूहळू राजकीय पक्षांची डोकी ठिकाणावर यायला सुरुवात झाली.

अधिकारी प्रामाणिक असतात. त्यांना प्रामाणिकपणे काम करू दिले तर ते काय करू शकतात याचे अलीकडच्या काळातील उत्तम उदाहरण म्हणून सोलापूर येथील होटगी





रोडवरील विमानतळाला सक्षम करण्याच्या कामाकडे पाहता येईल. प्रशासनात उत्तम अधिकारी आहेत. त्यांना काम करू देण्यापेक्षा बिघडवण्याचे कामच लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या पाठीशी असलेले राजकीय पक्ष करीत असतात. जर कोणी बिघडला नाही, तर त्याचा तुकाराम मुंढे होतो हे सर्वश्रुत आहे.

डोहाळे लागले की पुरवावे म्हणतात. बरे झाले कमळा बाईला होटगी रोडवरील विमानतळावरून विमान सेवेचे डोहाळे लागले. २९ सप्टेंबर २०२४ रोजी या विमानतळाचा तथाकथित लोकार्पण कार्यक्रम करून हे डोहाळे पुरविले गेले. हे बरे झाले. हे काम भारतीय जनता पक्षाच्या नेत्याने म्हणजेच माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. लोकार्पण म्हणजे काय रे भाऊ? असा प्रश्न मनात आला. त्यावर स्वतंत्र लिखाण होईल. आजमितीस भारतीय जनता पक्षाने लोकार्पणातून आपली हौस भागवून घेतली हे बरे झाले.

डोहाळे लागल्यानंतर मुलगा होईल का मुलगी हे समजण्यासाठी सारेच उत्सुक असतात. मग डोहाळ जेवणाचा कार्यक्रम करत असताना दोन वाट्या झाकून ठेवलेल्या असतात. त्यातील एक वाटी उचलायची. त्यात जो पदार्थ निघेल त्यानुसार मुलगा होईल की मुलगी याबाबतची स्वप्ने रंगविले जातात. आता सोलापूरकरांना कोणती विमान कंपनी येऊन सेवा देईल हे पाहण्याच्या प्रतिक्षेत राहावे लागणार आहे. विमान कंपन्यांना व्यवसाय करायचा आहे. तो राजकारण्यांनी करू दिला पाहिजे. परत त्यात आपल्या टक्केवारीचा आकडा घुसवू नये म्हणजे झाले. सोलापुरातील विमानसेवा अतिशय उत्तम तऱ्हेने चालेल यावर आमचा विश्वास आहे. याबाबत मनात शंका असणाऱ्यांनी शांत बसावे एवढेच सांगणे. वाटले कधीतरी, तर या विमानात बसून फिरून यावे. पण विनाकारण आगाऊ विचार व्यक्त करून सोलापूरच्या विमान सेवेबद्दल नकारात्मक भूमिकेत राहू नये.

चला. बाकी काही असो. सोलापुरातील होटगी रोडवरील विमानतळावरून विमानसेवा सुरू होण्यासाठी जे जे आवश्यक होते ते केले गेले. त्यासाठीचे सारे श्रेय आम्ही सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त यांनाच देऊ इच्छितो. या दोघांनीही आपली प्रशासकीय सेवा अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडलेली आहे. हे निखळ सत्य आहे आणि ते नाकारून चालणार नाही. बाकी सगळे शोभेचे नग आहेत.

**- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.**

---

**जन्म हा अखेरचा**

## ज्ञानशून्यस्थल



**पर उच्यते।। २०.७०।।**

ज्ञानशून्यस्थलात पोहोचल्यावर शिवयोग्याची स्थिती कशी असते? तर त्याचे काही कार्य नसते, कोणते कारण नसते, काही शेष नसते आणि शेषिभाव नसतो. तो कृतकृत्य झालेला असतो. करण्याजोगे जे असते ते त्याने केलेले असते. आता त्याच्यासाठी करण्याजोगे असे काही शिल्लक नसते. संसार मात्र असा आहे की संपता संपत नाही. मृत्यूशय्येवर पडलेला मनुष्य आपल्या मुलाला किंवा शिष्याला सांगतो, 'माझे अपुरे राहिलेले काम तू पूर्ण कर.' कितीही जन्म घेतले तरी सांसारिक कार्य पूर्ण होत नाही. काही ना काही शिल्लक राहतेच. संपूर्ण प्रपंच एका व्यक्तीच्या मालकीचा कधी होत नाही. याचा अर्थ असा की, 'प्रपंच संपूर्णतः एका व्यक्तीला मिळत नाही. परमात्मा मात्र असा आहे की तो पूर्णपणे शिवयोग्याला प्राप्त होतो. तो प्राप्त झाल्यावर मिळवावे असे काही राहत नाही. या स्थितीलाच मुक्ती, मोक्ष असे संबोधिले जाते.

स्वयंप्रकाश अशा ज्योतिर्लिंगात ऐक्य पावलेल्या शिवयोग्याला अन्य वस्तूंचे ज्ञान कसे होऊ शकेल? स्वस्वरूपाच्या ज्ञानाशिवाय अन्य कोणत्याही ज्ञानाला तेथे अवकाश नसतो. शिवयोगी निरुत्तर असतो. पूर्व-उत्तर या दिशा असतात. तत्त्वज्ञानात पूर्व व उत्तर हे दोन पक्ष (बाजू) असतात. पूर्व म्हणजे आधी आणि उत्तर म्हणजे नंतर.

प्रश्न विचारल्यानंतर शेवटी उत्तर दिले जाते. उत्तर म्हणजे अंतिम, शेवट. उत्तरक्रिया हा शब्द याच अर्थाचा आहे. या ठिकाणी प्रपंच हा पूर्व आहे आणि परमात्मा हा उत्तर आहे. याचा अर्थ असा की, परमात्मा हे अंतिम तत्त्व आहे. त्याच्या पलिकडे दुसरे तत्त्व नाही, म्हणून तो 'निरुत्तर' (निःउत्तर) आहे. अशा चित्स्वरूप, ज्ञानसंकल्परहित, सर्वपुरुषार्थरहित, स्वयंप्रकाश, निरुत्तर अशा परब्रह्माशी समरस झालेल्या शिवयोग्याच्या ठिकाणी ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान असा व्यवहार कसा राहील? त्या स्थितीत पोहोचल्यावर ऋषिमुनी मौन होतात. या ज्ञानशून्यस्थलाचा शेवटी समारोप करतात.

**यस्य कार्यदशा नास्ति कारणत्वमथापि वा।**
**शेषत्वं नैव शेषित्वं स मुक्तः**

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु**
**डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

**जनमानस**

## अविवाहित राहण्याचा महिलांचा ट्रेंड वाढत चालला

दिवसेंदिवस जगातील महिलांचा अविवाहित राहण्याचा कल वाढत चालला आहे असे दिसून येत आहे. चीनमध्ये हे प्रमाण वाढत चालले असल्याचे एका आकडेवारीनुसार दिसून आले आहे. सामाजिक व आर्थिक कारणामुळे तरुणांमध्ये लग्न न करण्याचा कल वाढतो आहे. एकटेच मजेत राहावे व जीवन घालवावे असे अनेकांना वाटते. त्यातही महिलांची परिस्थिती चिंताजनक आहे.

एका आकडेवारीनुसार जगातील २०३० पर्यंत सुमारे २५ ते ४४ या वयोगटातील ४५ टक्के महिला अविवाहित राहतील, ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. त्यातही लग्न झालेल्या अनेक स्त्रिया पुनर्विवाह करण्याची शक्यता नाही. हल्ली सर्वच देशात स्त्रिया करियरला किंवा शिक्षणाला महत्व देतात असे दिसून येत आहे. एकूणच ही परिस्थिती चिंताजनक आहे.

आजही कित्येक तरुणांची लग्ने अनेक कारणामुळे होत नाहीत असे चित्र आहे. मुली सुद्धा शिक्षित आहेत व अनेकजण नोकऱ्या करणाऱ्या आहेत.



साहजिकच त्यांच्या अपेक्षा खूपच आहेत. त्यामध्ये शहरात नोकरी, घर हवे तसेच घरात कोणी नातेवाईक नको अशा होत चालल्या आहेत. अनेक तरुण लग्नाविना राहिलेले दिसत आहेत ही सामाजिक परिस्थिती चिंताजनक आहे. काही दशकांपूर्वी मुली लग्न करताना आई वडिलांनी जे स्थळ पसंत केले आहे ते स्वीकारत होत्या.

आज ही परिस्थिती राहिलेली नाही अर्थात जोपर्यंत तुम्ही तरुण आहात व मिळवते आहात तोपर्यंत ठीक आहे पण जर वृद्धावस्थेत मात्र अविवाहित स्त्रियांची परिस्थिती काळजी करण्यासारखी होऊ शकते. आजारीपणात त्यांना अवलंबून राहावे लागेल. अशा परिस्थितीत वृद्धाश्रम वाढतील. एकूणच पुढील काळ हा अनेक दृष्टींनी महत्वाचा आहे. जे तरुण लग्न करतायेत, ते सुद्धा एक मुलावर समाधान मानत आहेत. सध्या जीवनमान महाग होत चालले आहे. शिक्षणावर खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. एकूणच चीन, भारत, जपान या देशात अविवाहित राहण्याच्या स्त्रियांच्या वाढत्या कलामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होणार आहेत.

**- शांताराम वाघ, पुणे.**

---


# महाराष्ट्राचे वाल्मीकी गदिमा

**मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर ऊर्फ गदिमा यांची आज १०५वी जयंती. त्यानिमित्त हा लेखप्रपंच...**

१ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काही काळ लेखनिक म्हणून काम केले. त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि. स. खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरुवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. 'भक्त दामाजी आणि पहिला पाळणा' या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला.

या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते 'चैत्रबन' ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत.

गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून



येते. त्यांच्या कवितेतील अरसल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना 'महाराष्ट्र वाल्मिकी' ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या.

गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली.

दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गूंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला.

१९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच.

आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

▶▶ ▶▶ ▶▶

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

### कोयत्याने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर** : पैसे हिसकावून घेतल्याच्या कारणावरून कोयता, दगड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत एक जण जखमी झाला. ही घटना ख्रिश्चन स्मशानभूमी जवळीत कार वॉशिंगच्या दुकानाजवळ रविवारी रात्री घडली. शंकर टेकसन तोलानी (वय ३० रा.संजय नगर कुमठा नाका) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रविवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास ते स्मशानभूमी जवळील सर्विसिंग सेंटर जवळ थांबले होते. त्यावेळी पैशाच्या कारणावरून त्यांना राहुल चन्नप्पा गायकवाड, गणेश उर्फ बापू पाटील, राम गायकवाड आणि इतर तीन लोकांनी मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.


**पाहिजेत**

बावधन, पुणे येथील प्रतिष्ठित व्यावसायिक कुटुंबास लहान बाळ सांभाळणेसाठी पूर्ण वेळ, बाळासंबंधी घरकाम सर्व कामे जमणारी महिला / मुलगी हवी आहे, राहण्याची उत्तम व्यवस्था,आकर्षक सुविधा, भत्ते. संपर्क - मो. 9881751122


# विठ्ठल-रुक्मिणीच्या दागिन्यांना झळाळी; मूल्यमापनास सुरुवात, दागिन्यांचाही इन्शुरन्स

**पंढरपूर/प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे आणि वारकऱ्यांचे दैवत म्हणून ओळख असलेल्या पंढरपूरच्या विठुराया आणि माता रुक्मिणीच्या खजिन्यात अतिशय अनमोल आणि जगात कुठेही न आढळणारे दुर्मिळ दागिने आहेत. आता रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या तज्ज्ञांकडून या दागिन्यांच्या मूल्यमापनास सुरुवात झालेली आहे. विठ्ठल रुक्मिणीच्या या अनमोल दागिन्यांचे पहिल्यांदाच मूल्यांकन होत आहे.**





इंग्लंडची राणी आणि कुवेतचा राजासह देशातील अनेक मोठमोठ्या मंदिरातील अनमोल दागिन्यांचे मूल्यमापन केलेले अनुभवी तज्ज्ञ पुरुषोत्तम काळे यांच्याकडून विठुरायाच्या दागिन्याचे मूल्यांकन सुरू करण्यात आले आहे. हे सर्व दागिने इसवी सन ५०० ते १८९२ या कालावधीतील असून असे दागिने जगात कोठेही उपलब्ध नसल्याचा दावा मूल्यांकन करते पुरुषोत्तम काळे यांनी केला आहे.

अतिशय पुरातन असणारे दागिने व्यवस्थित जतन करून ठेवण्यात येत असले तरी यापूर्वी त्याचे कधीही मूल्यांकन झालेले नव्हते. आता या दागिन्यांच्या मूल्यांकनाला सुरुवात झाली आहे. हे मूल्यांकन पूर्ण होण्यास पुढील दोन महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. एवढे मौल्यवान दागिने विठुरायाच्या खजिन्यात असून खबरदारी म्हणून त्याचे मूल्यांकन करून या दागिन्यांचा विमा उतरवला जाणार असल्याचे मंदिर व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

### कोण आहेत पुरुषोत्तम काळे?

पुरुषोत्तम काळे यांनी यापूर्वी तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, मुंबईचा जीएसबी गणपती, वडाळ्याचे विठ्ठल मंदिर आदी अनेक देवस्थानातील मौल्यवान दागिन्यांचे मूल्यमापन केले आहे. याशिवाय इंग्लंडची राणी आणि कुवेतचा राजा यांच्याकडे असणारे पुरातन व मौल्यवान दागिन्यांचे मूल्यमापन ही काळे यांनी केले आहे. काळे हे शासनाच्या अधिकृत मान्यता प्राप्त मूल्यमापनकार आहेत.

### १३ व्या ते १५ व्या शतकापर्यंतचे दागिने

विठुरायाच्या खजिन्यात तेराव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत जवळपास ३२५ अतिशय पुरातन व मौल्यवान दागिने असून यातील काही दागिने हे शिंदे-होळकर यांच्यासारख्या राजघराण्यातून अर्पण केले आहेत. मंदिर समितीचे सराफ खजिना विभाग आणि व्यवस्थापकांच्या उपस्थितीत हे मूल्यमापनाचे काम सुरू आहे. अनमोल हिरे आणि दागिने देवाच्या खजिन्यात असून अशा विविध पद्धतीचे मौल्यवान हिरे माणिक पाचू मोती हे आता जगात कोठेही पाहायला मिळत नसल्याचे काळे यांचे म्हणणे आहे.

## संक्षिप्त वृत्त

### निवडणूक आयोगाकडून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे कौतूक



**सोलापूर** : निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नियोजनाचे कौतूक केले. महिला मतदान नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी ग्रामसुरक्षा यंत्रणेचा वापर यासाठी केलेल्या तयारी व नियोजनाची दखल घेऊन राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातही सोलापूर प्रमाणे नियोजन करावे असे सूचित केले. सोलापूरचे जिल्हाधिकारी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजात स्वत: लक्ष घालून मतदानाची टक्केवारी वाढवणे व सर्व मतदान प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी अत्यंत कुशलतेने सामाजिक जाणीव ठेवून पूर्वतयारी व नियोजन करत असल्याबद्दल मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी कौतूक केले. महिला मतदारांची नोंदणी व ग्राम सुरक्षा यंत्रणा मार्फत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी केलेल्या नियोजनाची दखल मुख्य निवडणूक आयुक्त यांनी घेतली. या कामासह अन्य निवडणुकीच्या अनुषंगाने कामकाजात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद लक्ष घालत असल्याने नियोजन चांगल्या प्रकारे झालेले आहे. प्रारंभी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा निवडणूक प्रशासनाने विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या विविध कामाचे सादरीकरण आयोगासमोर सादर केले.


### खातगाव येथे ६० ब्रास वाळूसह ३२ वाहने जप्त



**सोलापूर** : खातगाव (ता. करमाळा) येथे अवैध वाळू उत्खननावर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये साधारण ६० ब्रास वाळू साठा जप्त करणत आला आहे. संबंधित अवैध वाळू उत्खनन करून साठा करण्यावर तहसिलदार स्तरवरून दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.ही कारवाई जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे मार्गदर्शनानुसार जिल्हास्तरीय गठित करण्यात आलेले उपविभागीय अधिकारी माळशिरस यांच्या अधिनस्त पथकामार्फत करण्यात आली आहे, असे उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी सांगितले. जिल्ह्यात अवैध गौण खनिजाच्या विविध प्रकरणांत एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२४ अखेर पर्यंत केलेल्या कारवाईमध्ये अवैध वाहतूक व उत्खननच्या आढळून आलेल्या एकूण प्रकरणे १७९ आहेत. या सर्व प्रकरणांत एकुण रक्कम रुपये ८१.६२ कोटी दंड आकारण्यात आला आहे. खतगाव येथे गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या विविध प्रणांत वापर करण्यात आलेले एकुण ३२ वाहने इतर ६ यंत्रसामग्री जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी दिली.

### कोंडी येथे बाटली आणि सळईने मारहाण; पती-पत्नी जखमी

**सोलापूर** : पैसे देण्याघेण्याच्या वादातून काचेची बाटली,सळई आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत पती-पत्नी आणि त्यांचा मुलगा असे तिघेजण जखमी झाले. ही घटना कोंडी (ता.उत्तर सोलापूर) येथील सुनील हॉटेल समोर शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी तालुक्याच्या पोलिसांनी तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रकाश रामकृष्ण काशीद (वय ४४) यांनी यासंदर्भात पोलीसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी प्रदीप मोरे,पांडुरंग भोसले आणि अमर पाटील (सर्व रा.कोंडी) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास हवालदार महिंद्रकर करीत आहेत.




### महालक्ष्मी नगरात घरफोडी लाखांचे दागिने लांबविले

**सोलापूर** : कुमठेगाव येथील मड्डी वस्ती येथील महालक्ष्मी नगरात राहणाऱ्या मिनाक्षी कुदरे यांचे बंद घर फोडून चोरट्याने १ लाख १९ हजाराचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी मिनाक्षी सिद्राम कुदरे (वय ४२) यांनी विजापुर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

१६ सप्टेंबर ते दि. १८ सप्टेंबर या दरम्यान चोरट्याने कुदरे यांच्या बंद घर फोडून आत वेश केला. पार्लरच्या खोलीमध्ये जावून सोन्याच्या २ अंगठ्या, सोन्याचे मणी यासह १ लाख १९ हजाराचा ऐवज चोरून नेला. अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास स.पो.नि. गायकवाड करित आहेत.

## लोकअदालतीत जिल्ह्यातील १० हजार ९९० प्रकरणांची तडजोड

**सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्हा न्यायालयात पार पडलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत जिल्ह्यातील १० हजार ९९० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये ८१ कोटी ५ लाख ८१ हजार ३६० रूपयांची तडजोड करण्यात यश आले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे आयोजित केलेल्या या लोकअदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहम्मद सलमान आझमी यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी जिल्हा न्यायाधीश पी.एम. खुणे, महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलचे सदस्य अ‍ॅड. मिलींद थोबडे, जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपुत, बार असोशिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. अमित आळंगे, जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक एम.के. ढोबळे आदि उपस्थित होते. जिल्हा न्यायालयासह सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये दिवसभर ही लोकअदालत पार पडली.

या लोकअदालतीत ३९ हजार ११० प्रलंबित प्रकरणे, ५१ हजार ४३५ दाखलपूर्व प्रकरणे असे एकूण ९० हजार ४३५ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ६०७ प्रलंबित प्रकरणात तडजोड झाली. तर ६ हजार ३८३ दाखलपुर्व प्रकरणे अशी एकुण १० हजार ९९० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या राष्ट्रीय लोकअदालतीच्या अगोदर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५ दिवस स्पेशल ड्राईव्ह प्रत्येक प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात घेण्यात आला. सोलापूर जिल्हयामध्ये या ५ दिवसामध्ये ३ हजार ३८० प्रकरणे निकाली काढली. त्यापैकी १५ वर्षे जुनी ५६३ खटले, १० वर्षे जुने ६३ खटले, १५ वर्षे जुने ६ खटले, २० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेला १, खटला, ३० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेले २ खटले, ४० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेला १ खटला निकाली काढण्यात यश आले.

### शहर अन् ग्रामीण वाहतूक शाखेचे स्वतंत्र पॅनल

शहर व ग्रामीण वाहतूक शाखेची ८ हजार ९५४ प्रकरणे तडजोडीसाठी होती. त्यापैकी २ हजार ३२८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकअदालतीमध्ये शहर व ग्रामीण वाहतूक शाखेने स्वतंत्र पॅनल तयार करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून डी.डी. कोळपवकर यांनी काम पाहिले. यामध्ये ८ हजार ९५४ इतकी प्रकरणे तडजोडीकरिता ठेवण्यात आली होती. त्यापैकी २ हजार ३२८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. व २१ लाख ८ हजार ६१० इतकी रक्कम वसुल करण्यात आली. सहाय्यक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर, राजन माने, पोलिस निरीक्षक तानाजी दराडे, उदय पाटील आदींचे सहकार्य मिळाले.

### कासेगाव येथून १२ शेळ्या पळवल्या

**पंढरपूर** : तालुक्यातील कासेगाव येथे दोघांच्या घरासमोर बांधलेल्या ६६ हजार रुपये किंमतीच्या १२ शेळ्या चोरट्याने पळवून नेले. ही चोरी रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात शब्बीर बादशाह शेख (रा. मठवस्ती कासेगाव) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. शब्बीर शेख यांनी त्यांच्या घरासमोर ७ शेळ्या आणि बोकड बांधली होती तर त्यांच्या घराजवळ राहणारे साहेबराव मुरलीधर जाधव यांनी त्याच पद्धतीने घरासमोर ५ शेळ्या बांधल्या होत्या . मध्यरात्रीनंतर चोरट्याने दोरी कापून जनावरे चोरून नेली. तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.

### महापालिकेची फॉरेस्ट येथील भाजी विक्रेत्यांवर कारवाई

## महिलांचे महापालिका प्रवेशद्वारासमोर आंदोलन

**सोलापूर** : महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने सोमवारी पुन्हा फॉरेस्ट येथील वाडिया हॉस्पिटल परिसरातील रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांवर पुन्हा कारवाई केली. या कारवाई विरोधात भाजी विक्रेत्या महिलांनी महापालिका मुख्य प्रवेशद्वारासमोर येऊन ठिय्या आंदोलन केले.



**सोलापूर : महापालिकेसमोर आंदोलनास बसलेल्या महिला भाजी व्रिकेत्या.**

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, नियमितपणे कारवाई सुरू आहे. सोमवारी शहरात दोन ठिकाणी कारवाई करण्यात आली. यामध्ये फॉरेस्ट येथील वाडिया हॉस्पिटलच्या समोरील रस्त्यावर अनधिकृत भाजी विक्रेत्यांवर पुन्हा कारवाई करण्यात आली. अनधिकृतपणे भाजी विक्री करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे रहदारीस अडथळा होत आहे. गेल्या तीन दिवसापासून प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात येत आहे.

दरम्यान, रेल्वे स्टेशन रोडवरील मंडईमध्ये जुने विक्रेते बसू देत नाहीत तर महापालिका प्रशासन सतत कारवाई करत असल्याने आम्ही जगायचं कसं असा प्रश्न उपस्थित करत येथील भाजी विक्रेत्या महिलांनी महापालिका मुख्य प्रवेशद्वारासमोर येऊन ठिय्या आंदोलन केले. आम्हाला तिथेच जागा द्यावी अशी मागणी केली. महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून अखेर त्या महिला परतल्या असल्याचे सांगण्यात आले.

## मनसेचे शिक्षक, शिक्षकेतर सेनेचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**सोलापूर** : महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक व शिक्षकेतर सेनेच्यावतीने राज्यस्तरीय उपक्रमशिल संस्था, उपक्रमशिल शाळा, राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक, गुणवंत शिक्षक आणि गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी अशा ३२ जणांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती मनसे शिक्षक सेनेचे प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवार दि. ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी एक वाजता शेठ मोरारजी कानजी सभागृह-स्टेशन रोड पंढरपूर येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. मनसेचे सहकार सेनेचे राज्य अध्यक्ष दिलीप धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मनसेच्या नेत्या शालिनी ठाकरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी मनसे शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष संजय चित्रे, राजा चौगुले, बाबू वागस्कर, पुणे शहर मनसे महिला अध्यक्ष वनिता वागस्कर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेला संतोष घोडके, विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे, विश्वास गजभार, अमर कुलकर्णी, जैनुद्दीन शेख, प्रकाश कोळी, अभि रंपुरे, वीरसंगाप्पा भोज आदींची उपस्थिती होती.

# रोटी कपडा व मकानसाठी जि.प. अभियंत्यांचे योगदान महत्त्वाचे

### सीईओ कुलदीप जंगम यांचे प्रतिपादन

**सोलापूर** : ग्रामीण भागातील सामान्य लोकांच्या जीवनासाठी आवश्यक असलेल्या रोटी, कपडा व मकानसाठी जि.प. अभियंत्यांचे योगदान महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

अभियंता दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम, जलसंधारण आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभियंता पुरस्कार वितरण प्रसंगी ते बोलत होते. फडकुले सभागृहात सोमवारी आयोजित कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, संतोष कुलकर्णी, संजय धनशेट्टी, संजय पारसे, उपअभियंता सुनील कटकधोंड, श्रीमती बिटला, अभियंता संघटनेचे अतुल सरडे, पंडित भोसले आदी उपस्थित होते.




**सोलापूर : जि.प.मधील अभियंत्यांचा सत्कार करताना सीईओ कुलदी जंगम व इतर अधिकारी.**

कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी स्वागत केले.

प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांनी कार्यक्रम आयोजनामागचा हेतू सांगितला. कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी यंदा अभियंत्याबरोबरच त्यांना कामात मदत करणाऱ्या टेंडर क्लार्क व सहाय्यकांचाही समावेश करण्यात आल्याचे स्पष्ट केले. यावेळी कार्यकारी अभियंता संजय पारसे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी यांनीही मार्गदर्शन केले.

याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या तिन्ही विभागातील ५० अभियंते व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांतर्फे भूमकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले. आभार कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी मानले. कार्यक्रमासाठी अविनाश गोडसे, झहीर शेख, संजय कांबळे, चेतन वाघमारे, वीरुपक्ष जेऊरे, म्हमाने,वेदपाठक, परिचारक, शशिकला म्हेत्रे, जोत्स्ना साठे, चेतन भोसले यांनी परिश्रम घेतले.

### सर्वांसोबत काम करणे हे अभियंत्यांना चॅलेंज

सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे अभियंत्यांना चॅलेंज आहे. आपण एका समाजामध्ये सर्व लोकांसोबत काम करतो. सरपंच, ग्रामसेवक सदस्य व नागरिक या सर्वांना सोबत घेऊन काम करावे असे आवाहन कुलदीव जंगम यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



पिलीव : आनंदाचा शिधा वाटपाचा प्रारंभ करताना आनंद पाटील, संचालक कुबेर भैस, दुकानदार महेश पाटील व इतर.

### आनंदाचा शिधा वाटपास सुरुवात

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील विकास सेवा सोसायटीच्या स्वस्त धान्य दुकानात गौरी-गणपती सणासाठी आलेल्या शिधा वाटपाचा प्रारंभ करण्यात आला. पिलीव विकास सेवा सोसायटीचे चेअरमन संतोष पाटील, संचालक कुबेर भैस यांच्या उपस्थितीत वाटप केले. एक किलो हरभरा डाळ, एक किलो तेल, एक किलो साखर व एक किलो रवा या चार जीवनावश्यक वस्तूंचे १०० रुपयांमध्ये वाटप करण्यात येणार आहे. यावेळी स्वस्त धान्य दुकानदार महेश पाटील, ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वेळापूर : धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने वृक्षारोपण करताना उत्तमराव जानकर. यावेळी सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, अमोल पनासे व श्री सदस्य.

### धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वेळापूर पालखी मैदानात वृक्षारोपण

**वेळापूर** : वेळापूर पालखी मैदान, येथे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा (ता.अलिबाग, जि. रायगड) यांच्यावतीने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम राबवण्यात आला. पालखी मैदान व खंडोबा मंदिर परिसर, वेळापूर येथे माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती उत्तमराव जानकर, वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, मिलिंद सरतापे, ग्रामविकास अधिकारी कैलास सुरवसे, उपसरपंच नानासो मुंगुसकर, ग्रामपंचायत सदस्य डॉ. शिवाजी पनासे-पाटील, सामाजिक कार्यकर्ते अमोल पनासे, विश्वास वाघे, वेळापूरातील सामाजिक, राजकीय, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य, धार्मिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. गेल्या अनेक वर्षापासून प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम महाराष्ट्रात राबविण्याचे काम केले जाते. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे वेळापूर, श्रीपूर, माळशिरस या भागातून श्रीसमर्थ बैठकीतून २०५ श्रीसदस्य उपस्थित होते. यावेळी २०० झाडे लावून त्या झाडांना लोखंडी गार्ड लावण्यात आले. झाडांचे संगोपन पाच वर्ष केले जाणार आहे.



परंडा : रस्त्याच्या भुमीपूजन प्रसंगी उपस्थित ग्रामस्थ.

### शेळगाव रोड ते जरांडे वस्ती रस्त्याचे भूमिपूजन

**परंडा** : आरोग्यमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या सहकार्याने व धनंजय सावंत यांच्या माध्यमातून पांढरेवाडी पश्चिम शेळगाव रोड ते जरांडे वस्ती रस्त्याचे काम गावकऱ्यांच्या हस्ते नारळ फोडून सुरू करण्यात आले. याप्रसंगी रमेश जरांडे, दादा भोईटे, साहेबराव पवार, बापू पवार, राजेंद्र जरांडे, कृणाल पवार, महादेव पवार, पाटील जराडे, यशवंत पवार इ. ग्रामस्थ उपस्थित होते.

### रोहित बोलगमवार यांची अध्यक्षपदी निवड



**सोलापूर** : अशोक चौक सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी रोहित बोलगमवार यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष श्रीधर अंदे, नरेंद्र इंगळे, दशरथ पाथरुट, विनायक कुरी, सचिव नवीन शेरला, सहसचिव महेश घोडके, काकासाहेब जाधव, खजिनदार राजेश घोडके, सहखजिनदार बबलू बंदपट्टे, प्रकाश पासकंटी, कार्याध्यक्ष महादेव घोडके, अंबादास चव्हाण, नटराज भरले, प्रकाश कुन्हाडकर, शशी पगडे, मिरवणुकप्रमुख दिनेश घोडके, राजू मंजेली, गंगाराम निंबाळकर, अंबादास इराबत्ती, सुनील दाते, विजय चिप्पा, विशाल इरकल, जुबेर कमिशनर, विक्की लिबोळे. पुजा समिती- विकास कुलकर्णी, आदित्य घोडके, तुळशीदास पासकंटी, पप्पू दांगडे अशारीतीने निवडी करण्यात आल्या.

# ‘वंचित’च्या जनसंवाद यात्रेला भरघोस प्रतिसाद

## अक्कलकोट तालुक्यात महिनाभरापासून कार्यक्रम



अक्कलकोट : वंचित बहुजन आघाडीच्या यात्रेत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्यावतीने दि. ८ सप्टेंबरपासून संपूर्ण तालुक्यात जनसंवाद यात्रा काढण्यात आली होती. त्याला अक्कलकोटच्या जनतेकडून भरघोस असा प्रतिसाद मिळाला.

ओबीसी समाजापर्यंत आरक्षणाचा महत्त्व आणि एससी एसटी आरक्षणाविरोधात सुप्रीम कोर्टाचा १ ऑगस्ट २०२४ ला जो निर्णय आला त्याबद्दलची जनजागृती करण्यासाठी आणि बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या जनसंवाद यात्रेचा आयोजन वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्यावतीने केले होते. आठ तारखेपासून गोसावी वस्ती, सांगवी, शिरसी, शिरवळ, वागदरी, भूरीकवठा, किरनळ्ळी, बदोला, किणी, काझीकणबस, कुरनूर, चुंगी, हन्नूर, बुऱ्हाणपूर, चपळगाव, अक्कलकोट स्टेशन, शावळ, कर्जाळ, कोन्हाळी, हंजगी, बॅगेहळ्ळी, कडबगाव, दोड्याळ, जेऊर, हांद्राळ, मुंडेवाडी, कुडल, देवी कवठा, बासलेगाव, कलप्पावाडी, कंटेहळी, बोरी उमरगे, मिरजगी, दुधनी, सिन्नर, नागूर, इब्रामपूर, मुगळी, संगोळगी, बणजगोळ, निमगाव, गौडगाव, हत्ती कणबस, चिकेहळ्ळी, इत्यादी गावात फटाके फोडून ढोल ताशा लावून जनतेने या जनसंवाद यात्रेचा स्वागत करण्यात आला.

दुसऱ्या टप्प्यात राहिलेले गाव पूर्ण करणार आहे. असून आरक्षण आपल्या हक्काचा आहे ते संपवण्याचे षड्यंत्र सध्या चालू असून याबाबत जनजागृती या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून करण्यात आली.

वंचित बहुजन आघाडी युवक तालुकाध्यक्ष शिलामणी बनसोडे, माथाडी कामगार जिल्हाध्यक्ष ज्योतिर्लिंग स्वामी, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ते रविराज पोटे, माथाडी कामगार तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, तालुका महासचिव नागेश हरवाळकर, जिल्हा संघटक देवानंद अस्वले, युवक जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, गंगाराम गायकवाड, युवक आघाडी तालुका उपाध्यक्ष संकेत शिरसे, सोमनाथ दसाडे, चिदानंद गाडेकर, यशवंत इंगळे, गंगाराम वाघमारे, शहर उपाध्यक्ष सुनील शिंगे, महासचिव भारत देडे, तालुका संघटक बबन गायकवाड, शहर युवक अध्यक्ष संदीप बाळशंकर, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, देविदास नडगम, भीम मडीखांबे, योगेश सोनकांबळे आनंद सोनकांबळे, शिवा नाटिकर, तालुका महासचिव गौतम गायकवाड तालुका उपाध्यक्ष नरसिंह गायकवाड, रतन इंगळे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**आरक्षण संपवण्याचे षडयंत्र सुरुः मडिखांबे**

एससी, एसटीच्या आरक्षणामध्ये सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून वर्गीकरण करून आणि क्रिमिलेयर लावून कुटुंबातल्या एकाच व्यक्तीला यापुढे आरक्षण घेता येईल, अशी अट सुप्रीम कोर्टाने घातल्यामुळे एससी एसटीचे आरक्षण संपविण्याचे षड्यंत्र चालू आहे. या गोष्टीला ना सत्ताधाऱ्यांचा विरोध आहे ना विरोधकांचा. त्यामुळे ही जनसंवाद यात्रा काढल्याचे सोलापूर वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी सांगितले.

# माळशिरस विधानसभा पुन्हा भाजप जिंकणार : जमवाल

**पिलीव/प्रतिनिधी**

महायुतीच्या कामाच्या जोरावर माळशिरस विधानसभा पुन्हा एकदा भाजप जिंकणार असल्याचे मत क्षेत्रिय संघटनमंत्री अजय जमवाल यांनी व्यक्त केले.

भाजप माळशिरस विधानसभा यांच्यावतीने तरंगफळ (ता. माळशिरस) येथे विधानसभापूर्व नियोजनाची बैठक पार पडली, त्यात ते बोलत होते.

मध्यप्रदेश व छत्तीसगड क्षेत्रीय संघटनमंत्री अजय जमवाल, भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यालयीन महामंत्री रघुनाथ कुलकर्णी, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, आ. राम सातपुते, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, जिल्हा प्रभारी विक्रम देशमुख, जिल्हा समन्वयक राजकुमार पाटील, के. के. पाटील, सोपान नारनवर, आप्पासाहेब देशमुख,



पिलीव : पिलीव येथील सभेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अजय जमवाल.

बी. वाय. राऊत, हनुमंत सूळ, बाळासाहेब वावरे, दादासाहेब उराडे आदी उपस्थित होते.

विधानसभा क्षेत्रात बूथ मजबुतीकरण करणे गरजेचे आहे. प्रत्येक बूथवर कार्यकर्त्यांची फळी निर्माण झाली पाहिजे. यापूर्वी त्यांनी छत्तीसगड व मध्य प्रदेशमध्ये संघटनमंत्री असताना भाजपाचे सरकार आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्राची पूर्ण जबाबदारी त्यांच्याकडे दिलेली आहे.

जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांनी तालुक्याचा आढावा सांगितला तर संघटन मंत्री रघुनाथ कुलकर्णी यांनी सरकारच्या योजनेची माहिती सांगितली. सूत्रसंचालन बाळासाहेब सरगर यांनी तर आभार संजय देशमुख यांनी केले.

> सोलापूरच्या पराभवाने खचून न जाता बरेच काही शिकून गेलो आहे. आता मी पक्षाचा कार्यकर्ता असल्याने पक्ष जो आदेश देईल तो मी शिरसावंद्य मानून विधानसभा निवडणूक भाजप जिंकण्यासाठी जीवाची बाजी लावणारा आहे. माळशिरस तालुक्यात दहा हजार कोटी रुपयांची विकासकामे केली आहेत.
>
> **- आ. राम सातपुते.**



पंढरपूर : स्वेरी महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करताना डॉ. बी. पी. रोंगे.

# स्वेरीची नेहा झिरपे बुद्धिबळ स्पर्धेत तृतीय

**पंढरपूर/प्रतिनिधी**

बेलाटी येथील बीएमआयटीमध्ये आयोजित विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची नेहा झिरपे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

नेहा ही इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. या विजयानंतर ती साऊथ झोनसाठी होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. तसेच त्यांना क्रीडा महोत्सवातही सहभागी होता येईल. डिसेंबरमध्ये गडचिरोली येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या प्रोत्साहनाचा तिला फायदा झाला.


नेहाला दीपक भोसले व प्रा.संजय मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी स्वेरीत नियमित योगा करून घेतला जातो. स्वेरीमधील अत्याधुनिक जिमचा मुलांना फायदा यदा होतो.

सांघिक बुद्धिबळ स्पर्धेत सिव्हिल इंजिनिअरिंगच्या सई मोरे व प्रियांका चव्हाण, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील जुई गवसाने यांनी देखील दहा संघांमध्ये तृतीय क्रमांक पटकावल्यामुळे त्या आंतरविद्यापीठ स्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. स्वेरीच्यावतीने नेहा झिरपे, सई मोरे, प्रियांका चव्हाण व जुई गवसाने यांचा संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यशस्वी स्पर्धकांचे संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

# सकारात्मक विचार असल्यास व्यक्ती प्रफुल्लित : ब्रह्मकुमार पियुष

## स्वेरीत ‘निसर्ग आपत्ती व्यवस्थापन’ विषयावर मार्गदर्शन



पंढरपूर : स्वेरीतील कार्यक्रमात बोलताना ब्रह्मकुमार पियुष. समोर उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी.

**पंढरपूर/प्रतिनिधी**

कोणतेही काम करताना आपल्या चेहऱ्यावर उत्साह असावा तसेच विचारात सकारात्मकता ठेवल्यास व्यक्ती अजून प्रफुल्लित होतो, असे प्रतिपादन ब्रम्हकुमारी विश्वविद्यालयाचे ब्रह्मकुमार पियुष यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या खुल्या रंगमंचावर ‘निसर्ग, पर्यावरण आणि आपत्ती व्यवस्थापन’ या विषयावर आयोजिलेल्या एक दिवसीय मार्गदर्शन सत्रामध्ये पियुष ‘विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि त्यांची मानसिकता’ यावर मार्गदर्शन करत होते. प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी जीवनात उत्तम मार्गदर्शनाची गरज असते त्यामुळे आपले जीवन योग्य दिशेने जावून सुखकर होते, असे सांगितले.

ब्रह्मकुमारी अस्मिता, ब्रह्माकुमारी सोमप्रभा यांनीही संबोधित केले. पियुष यांनी विद्यार्थ्यांकडून प्रेरणादायी प्रात्यक्षिके करून घेतली. ब्रह्मकुमार प्रताप शिंदे यांनी ‘प्रकृती, पर्यावरण आणि आपत्ती व्यवस्थापन’ याविषयी प्रतिज्ञा दिली.

ब्रह्मकुमारी संगीता, उज्वला, गीता, नीता, मीरा, लता, कीर्ती, दुर्गा, जयश्री, कांचन, प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आर. एन. हरिदास, स्वेरी अंतर्गत असलेल्या अभियांत्रिकी, फार्मसीच्या पदवी व पदविका तसेच एमबीए, एमसीए या पदव्युत्तर पदवीचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

**स्वेरीमधील नियमित प्राणायाम स्तुत्य**

‘मेडिटेशन’ करिता स्वेरीमध्ये ‘प्राणायाम’ हे नियमितच्या वेळापत्रकात ठेवले आहे. ही बाब उत्तम असून याचे इतर महाविद्यालयांनी अनुकरण करावे, अशी सूचना ब्रह्मकुमार पियुषभाई यांनी केली.

# एजीपाटील ते अनंत स्मार्ट रस्त्याची दुरवस्था

**सोलापूर** : एजी पाटील अभियांत्रिकी महविद्यालय ते अनंत स्मार्ट सिटीकडे जाणारा रस्ता दोन वर्षांपुर्वीच नव्याने तयार केला होता. मात्र गेल्या ३-४ महिन्यांपासून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. रस्त्यावरुन खड्डे चुकवत जाताना वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# भोगावमधील १९ मतदार यादीतून वगळले

## मोहोळच्या तहसीलदार पाटील यांची माहिती

## उर्वरित १५ मतदारांची चौकशी होणार

**उत्तर सोलापूर/प्रतिनिधी**

उत्तर तालुक्यातील भोगावमध्ये मतदार यादीत समाविष्ट झालेल्या एका समाजाच्या नागरीकांची १९ नावे यादीतून वगळल्याचे मोहोळ तहसीलदार पाटील यांनी पत्राद्वारे कळवले आहे.



भोगावच्या माजी सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महिला जिल्हा कार्याध्यक्षा उज्वला पाटील यांनी याबाबत केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. उर्वरित बोगस मतदारांची चौकशी केली जाणार असल्याचे पाटील यांनी म्हटलं आहे.

उत्तर तालुक्यातील मोहोळ विधानसभा मतदारसंघातील भोगावमध्ये २०१५ च्या ग्रामपंचायत निवडणुकीत उज्वला पाटील या सरपंचपदावर कार्यरत होत्या. त्यावेळी भोगाव मध्ये त्या समाजाचे एकही घर नव्हते आणि आताही नाही.

२०२० मधील ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये त्या समाजाची ३४ मते आली, तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दीडशे नागरिक आपली मतदार यादीमध्ये नावे पाहण्यासाठी रांगेत दिसली. ग्रामपंचायतीमध्ये चौकशी केली असता ग्रामपंचायतीने एकही दाखला दिला नाही. त्यांची आधार कार्ड कशी काढली गेली, मतदार यादीत नावे आली कशी? याची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई व्हावी आणि ती नावे मतदार यादीतून वगळावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली होती.

जा. क्र. बांध/८९२/२०२४
दि. ३०/०९/२०२४

**माढा नगरपंचायत, माढा**

**ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना क्र. MCMADHA/ /२०२४**

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या **स्वच्छ भारत अभियान बक्षीस रकमेतून** योजनेअंतर्गत अ. क्र. ०१ हाती घेण्यात आलेल्या विकासकामांची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार-अर्हताप्राप्त निविदाधारकांकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण ०१ कामे आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. ०१/१०/२०२४ ते दि. ०८/१०/२०२४ पर्यंत सायं. ५ वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादींची माहिती http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

शिक्का

**सही/-**
मुख्याधिकारी
माढा नगरपंचायत

**कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर**

**ता. माळशिरस, जि. सोलापूर**

फोन. नं. ०२१८५/२५५२३३,३३४ फॅक्स नं. ०२१८५/२५५४३५
Email - spssk_sugar@yahoo.com Email - spssk_sale@yahoo.com

***** खुली साखर विक्री टेंडर *****

आमचे कारखान्याकडे हंगाम २०२३-२४ मधील शिल्लक असलेल्या व हंगाम २०२४-२५ मध्ये उत्पादित होणाऱ्या साखर पोत्यांपैकी, माहे ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत खुल्या बाजारात साखर विक्रीसाठी ५० किलो एम-३०, एस १-३० व एस २-३० या ग्रेडची सिलबंद टेंडर्स प्रत्येक आठवड्यातील सोमवार व गुरुवार या दिवशी स्वतंत्ररित्या मागविण्यात येत आहेत. सदरच्या दिवशी सुट्टी असल्यास त्याचे दुसऱ्या दिवशी टेंडर मागविण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक टेंडरमध्ये विक्री करावयाची साखर पोती डिलीव्हरीची मुदत व टेंडरची वेळ त्या-त्या टेंडरचे दिवशी कळविली जाईल. सदर दिवशी कारखाना साईटवर ई-मेल व फॅक्सद्वारे टेंडर स्वीकारली जातील. टेंडर मंजूर झालेनंतर ज्या त्या टेंडरमध्ये खरेदी केलेल्या साखरेची संपूर्ण किंमत ४८ तासाचे आत आरटीजीएसने किंवा डी. डी./चेक ट्रान्सफरद्वारे कारखान्याच्या बँक खात्यात जमा करावयाची आहे. दिलेल्या मुदतीत साखर उचलणे बंधनकारक राहील.

टेंडरबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापनाने राखून ठेवले आहेत. तरी टेंडरधारकांनी आपली टेंडर्स वेळेत पाठवावीत.

**डॉ. यशवंत कुलकर्णी** कार्यकारी संचालक | **श्री. कैलास खुळे** व्हा. चेअरमन | **मा. आ. श्री. प्रशांतराव परिचारक** चेअरमन

**वेल्फेअर सोसायटी फॉर द डेफ ॲण्ड डम्ब सोलापूर संचलित,**

**रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालय**

**लक्ष्मी पेठ, दमाणी नगर, सोलापूर - ४१३००१**

**पाहिजेत**

वरील शासनमान्य शाळेत **विशेष शिक्षक** ही रिक्त पदे भरावयाचे असून पात्र उमेदवारांनी आपले अर्ज **दिनांक १०/१०/२०२४ वार गुरुवार पर्यंत** शाळेच्या कार्यालयात (शासकीय सुट्टी वगळता) ११ ते ०५ या वेळेत पोहोच करावेत. वेळेत आलेल्या अर्जाचाच विचार करण्यात येईल. **तसेच दिनांक १४/१०/२०२४ वार सोमवार रोजी दुपारी ०३.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखतीस आपल्या मूळ कागदपत्रासह उपस्थित रहावे. वयोमर्यादा शासन नियमाप्रमाणे.**

| अ. क्र | पदाचे नाव | पद संख्या | जातीचा प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | विशेष शिक्षक | २ | अजा/भजब/ एसईबीसी/ ईडब्ल्यूएस | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मूकबधिर प्रवर्गातील पदविका D.ed/ B.ed. [HI] आर.सी.आय. नोंदणी प्रमाणपत्रधारक, MSCIT उत्तीर्ण मूकबधिर मुलांना शिकवण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य |

**सचिव**
**(रोटे. सुनिल दावडा)**
वेलफेअर सोसायटी फॉर द डेफ ॲन्ड डम्ब, सोलापूर

# ‘माझी वसुंधरा’मध्ये कामती खुर्द राज्यात द्वितीय

विरवडे/प्रतिनिधी

कामती (खुर्द), ता मोहोळ ग्रामपंचायतने महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या 'माझी वसुंधरा' अभियानात २५०० ते ५००० लोकसंख्या गटातून राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. यासाठी तब्बल ७५ लाख रुपयाचे प्रोत्साहन बक्षीस मिळणार आहे.

गेल्या चार वर्षापासून शासन ग्राम स्तरावर शाश्वत व मूलभूत गोष्टींवर काम करीत आहे. या मध्ये भूमी,जल, आकाश,अग्नी,वायू या पंच तत्वावर घटकांचा समावेश आहे. या संदर्भात कामती खुर्द ग्रामपंचायतने भरीव काम करताना विविध उपक्रम राबवले आहेत. जलसंधारण, प्लास्टिक मुक्ती, वृक्ष लागवड, मानवीय प्रशिक्षण, लोकसहभाग, बायो गॅस व सौर ऊर्जासारख्या शाश्वत ऊर्जा वापर व प्रसार, वेगवेगळ्या स्पर्धा, मेळावे, चर्चा परिसंवाद आदी उपक्रमांचा समावेश आहे.

या साठी सरपंच सविता माळी, उपसरपंच दिपक काटकर, सर्व सदस्य, ग्रामसेविका मंजुश्री कारंडे, कर्मचारी महावीर रणदिवे, दिपक तरंगे, रविराज माने, तुकाराम क्षीरसागर, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, प्राथमिक शिक्षक, स्थानिक लोक ,तरुण मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. आ. यशवंत माने, माजी आ. राजन पाटील, सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे व्हाईस चेअरमन दिपक माळी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. लवकरच राज्यस्तरावर या पुरस्कारचे वितरण होणार आहे.

# उसामधील आंतरपिकातून ४ लाखांचे उत्पन्न

## अंबड येथील तरुण शेतकऱ्याची दोन महिन्यात दीड एकरातून कमाई

माढा/प्रतिनिधी

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नियोजनबद्ध खतांची मात्रा, योग्य वेळेत फवारणी करत नव्याने लागवड केलेल्या ऊस पिकात घेतलेल्या आंतरपिकातून अंबडच्या तरुण शेतकऱ्याने दोन महिन्यात दीड एकरातून ४ लाख १० हजारांचे उत्पन्न घेतले आहे.

शरद चंद्रकांत गाडे (वय ३०,रा. अंबड, ता. माढा) असं त्या तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. त्याने उसात आंतरपीक म्हणून सेंट कोबी व फ्लावरची ठिबक सिंचन वर बोधावर लागवड केली. दोन्ही पिकांची रोपे, फवारणी, खते व इतर कामांसाठी एकूण ६० हजारांचा खर्च आला. यातून ३ लाख ५० हजारांचा निव्वळ नफा मिळाला आहे. दीड एकर क्षेत्रावर अवघ्या दोन महिन्यांच्या कालावधीत तब्बल ४ लाख १० हजार रुपयांचे भरघोस उत्पादन घेऊन अंबाड ता.माढा येथील तीस वर्षीय तरुण शेतकऱ्यांने इतर शेतकऱ्यापुढे एक आदर्श निर्माण केला आहे.

शरद गाडे एकूण ९ एकर शेत जमीन असून एकत्र कुटुंब पद्धत असल्याने वडील चंद्रकांत गाडे यांच्यासह आई, भाऊ, पत्नी सर्वजण शेती व्यवसाय करतात. शरद गाडे याचे बारावी शिक्षण झाल्यानंतर तो शेती व्यवसायाकडे वळाला. अत्याधुनिक पद्धतीने शेती करू लागला.आतापर्यंत त्याने आपल्या शेतीमध्ये अनेक पिकांबाबत नवनवीन प्रयोग केले आहेत.

यात तो यशस्वी देखील झालेला आहे. त्यामुळे त्याची शेती पाहण्यासाठी इतर शेतकरी त्याच्याकडे नेहमी ये जा करतात. यशस्वी तरुण शेतकरी म्हणून त्याचे सध्या सर्वत्र कौतुकही होत आहे.



माढा : उसातील फ्लावर व कोबी या आंतरपिकांसह शरद गाडे व त्यांचे सहकारी.

शरदने जून महिन्याच्या सुरुवातीला नव्याने ऊस लागवड करण्यासाठी दीड एकर जमिनीची ट्रॅक्टरद्वारे नांगरणी, कुळवणी केली. त्यानंतर सरी सोडण्यात आली. सरीत २६५ जातीचे ऊसाचे बेणे लावले. काही दिवसानंतर ऊस फुटल्यानंतर त्याच्या बोधावर एका नर्सरीतून विकत आणलेली नामांकित कोबीची १२ हजार रोपे व नामांकित फ्लॉवरची १२ हजार रोपे सव्वा फुटांच्या अंतरावर लागवड केली. त्यालाही ठिबक सिंचनची सुविधा उपलब्ध केली. दोन महिन्यांच्या कालावधीत एकूण तीन वेळेस औषधांची फवारणी करण्यात आली. दरम्यान १५:१५, १०:२६:२६, १८:४६ यासारख्या खतांची भेसळही झाडांना टाकली. ठिबक सिंचन द्वारे ह्युमिक सिड सोडले.शेण खताचाही वापर केला.

कोबी व फ्लावर हे दोन महिने दहा दिवसांनी एक दीड किलोच्या दरम्यान वजनाचा होऊन काढण्यास योग्य झाल्यानंतर शरदने बार्शी, कुर्डूवाडी, अकलूज, पुणे यासारख्या मार्केटमध्ये ठोक बाजार भावाने विक्री केली. त्यात फ्लावरला सरासरी ४० ते ५० रुपयांचा तर कोबीला ७ ते ८ रुपयांचा भाव मिळाला. दीड एकराच्या निम्म्या क्षेत्रातून कोबी १३ टन तर निम्म्या क्षेत्रातून फ्लॉवर १५ टनाच्या जवळपास उत्पादित झाला. दोन्ही आंतरपिकातून जवळपास एकूण ४ लाख १० हजारांचे उत्पन्न निघाले.

यासाठी त्याला विष्णू सावंत, किरण लोंढे, तुकाराम चव्हाण, वैभव लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. या अगोदरही या तरुण शेतकऱ्यांने मेथी, चुका, शेपू व कोथिंबीर यासारखी आंतर पिके घेऊन मोठे उत्पन्न मिळवलेले आहे.

### अशी केली जोपासना

- नामांकित कंपन्याच्या दर्जेदार बियाण्यांची निवड
- ठिंबक सिंचनाचा वापर
- शेणखत, विद्राव्य खतांसह पिक संवर्धकांचाही वापर
- योग्य बाजारपेठेत विक्री
- तझांकडून मार्गदर्शन

# सोलापूर महापालिकेला दोन कोटींचा विशेष पुरस्कार

सोलापूर/प्रतिनिधी



माझी वसुंधरा ४.० अभियानात सोलापूर महानगरपालिकेला भूमी या विभागात राज्यस्तरावरील ३ लाख ते १० लाख लोकसंख्याचा गटात एकमेव शहरास दोन कोटींचा विशेष पुरस्कार मिळाला आहे. यामुळे यंदाही सोलापूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. भूमी या घटका अंतर्गत मनपाने वन विभाग, पर्यावरण प्रेमी संस्था व महाविद्यालयांचा माध्यमातून वर्षभरात एकुण २.५ लाख देशी प्रजातीच्या झाडांची लागवड केली. मागील चार वर्षापासून लावलेल्या झाडाचे संगोपन करून त्यांना जगवले आहे. शहरात मनपाने रोपवाटिका तयार केल्या. नगर शहर हरित व सुंदर दिसण्यासाठी हरित अच्छादने तयार केली. कचऱ्याचे घरोघरी संकलन करून त्यावर प्रक्रिया करण्यात येत असुन त्यामधून विजनिर्मिती व खत निर्मिती करणेत येत असुन हरित ब्रॅण्ड प्रमाणपत्र मिळविले आहे. तसेच सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी जनजागृती करण्यात येऊन दंडात्मक कारवाई देखील करण्यात आलेत. माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये देखील मनपाला पुणे विभागातील प्रथम क्रमांक प्राप्त झाला असता २ कोटीचे बक्षीस मिळाले होते. त्यामधून मनपाने ३ उद्याने व १६०किलोवेट सोलर पॅनल बसविले आहेत.

# मार्ग फाउंडेशन पोहोचले घराघरात

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

संतोष पवार, संस्थापक अध्यक्ष, मार्ग फाउंडेशन सोलापूर हे दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुक लढविण्याची जोरदार तयारी करत आहेत. त्यांचे कार्यकर्ते प्रतम्येक गावात, प्रत्येक घरात जावून त्यांचे विचार पोहोचवत आहेत.

संतोष पवार यांची कार्यशैली सुरुवातीपासूनच सोलापूरकरांना कल्पक वाटत आलीय. त्यांची सामाजिक कार्याची पद्धतही अगदी अनोखी आहे, संपूर्ण प्रथम नियोजन, दृष्टिकोन, विचार, पूर्व-तयारी अन् नंतर पूर्णत्वाकडे वाटचाल अशी नियोजनबद्ध कार्याची पद्धत ही मार्ग फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांकडे शिस्तबद्धरित्या नेहमीच असते.



दक्षिण सोलापूर : घरोघरी जावून प्रचार करताना मार्ग फाउंडेशनचे कार्यकर्ते.

### मार्गचा मार्ग हा यशोशिखराकडे नेणारा

सामाजिक माध्यमांचे नियोजन असो की रणनीती-कक्ष (वॉर-रूम) असो की त्यांची प्रसिद्धी असो, ह्या सर्व बाबतीत मार्गचा मार्ग हा यशोशिखराकडे नेणारा आहे यात शंका नाही.

सध्या मार्ग फाउंडेशनची चर्चा दक्षिण सोलापुरात जोर धरून आहे ती त्यांच्या कल्पकतेने तयार केलेल्या डिजिटल जाहिरात बोर्डची.

दक्षिणमधील प्रत्येक कानाकोपऱ्यात हे डिजिटल बोर्ड दिसत आहेत. त्यात आमदार कसा असावा या मतदारांच्या जागरूकतेची जाणीव ठेऊन केलेल्या कल्पकतेची चुणूक दिसते.

### संतोष पवार यांच्या सामाजिक कार्याची दिली जातेय माहिती

दक्षिण सोलापुर मतदारसंघातील प्रत्येक गल्ली, मोहल्ला, तांडा, वाडा, वस्ती, अपार्टमेंट इ. ठिकाणी मार्गचे कार्यकर्ते स्वतः प्रत्येक घरात जाऊन संतोष पवार यांच्या सामाजिक कार्याची माहिती असलेले माहिती पुस्तक देत आहेत. ‘मार्ग’ची माहिती देऊन त्यांच्या समस्याही जाणून घेत आहेत.

# संग्राम मोर्चात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : कोगनूरे



दक्षिण सोलापूर : सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे आयोजित भव्य संग्राम मोर्चामध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी, महविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विराट संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन दक्षिण काँग्रेसचे नेते तथा एम. के. फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनूरे यांनी केले आहे.

शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्काच्या, विविध मागण्यासाठी, महायुती सरकारविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भव्य संग्राम मोर्चा आयोजित केला आहे. मंगळवारी (दि.१) ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजता चार हुतात्मा पुतळा, पार्क चौक येथून हा मोर्चा निघणार आहे. मोर्चामध्ये जिल्ह्यातील सर्व शेतकरी, नागरिक बंधू भगिनींनी, तसेच दक्षिण सोलापूर काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन दक्षिण काँग्रेसचे नेते तथा एम के फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनूरे यांनी केले आहे.

# सरपंच वनिता सुरवसे राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्काराने सन्मानित

अक्कलकोट/प्रतिनिधी

गोगाव (ता. अक्कलकोट) च्या सरपंच वनिता सुरवसे यांचा राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव यांच्या हस्ते आणि श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



अक्कलकोट : वनिता सुरवसे यांना पुरस्कार देताना ॲड. विकास जाधव, डॉ. श्रीकांत येळेगावकर आदी.

अविष्कार सोशल अँड एज्युकेशन फाउंडेशन इंडियाच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त राज्यभरातील शिक्षकांचा सन्मान सोहळा सोलापूर येथे आयोजित केला होता. शिक्षक, सरपंच आणि उद्योजक अशा तिन्ही क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या मान्यवरांचा सन्मान अविष्कारचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला. सरपंच वनिता सुरवसे या सरपंच परिषद सोलापूरच्या जिल्हा समन्वयक असुन परिषदेमार्फत सर्व सरपंचांना मार्गदर्शन करत वेगवेगळ्या आंदोलनात सरकारला वेठीस धरून मागण्या पूर्णत्वास आणल्या आहेत. त्यांच्या गावामध्ये मोठ-मोठी कामे करून अक्कलकोट तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात गोगाव ग्रामपंचायतीचे नाव उज्वल केले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील, पदमश्री पोपटराव पवार, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शाश्वत कामे ग्रामपंचायतीत करून ग्रामपंचायतीचा महसूल तिपटीने वाढविला.

ग्रामविकास मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय कृषिमंत्री, केंद्रीय ग्रामविकास मंत्री यांच्यापर्यंत पोहोचून त्यांना निवेदन देऊन ग्रामपंचायतच्या अडचणी सांगितल्या. कामाची दखल घेऊन अविष्कार फाउंडेशनने त्यांना राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्याबद्दल फाउंडेशनचे अध्यक्ष संजय पवार व अन्य मान्यवरांचे सरपंच वनिता सुरवसे यांनी आभार मानले आहे.

कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते उमेश पाटील, अविष्कारचे जिल्हाध्यक्ष श्रीसात पटेल, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष मनोज कंगळे, जिल्हा संघटक स्नेहल खंकाळ, रेखा सोनकवडे, ए बी शेख, जब्बार सिकलगार, शंकरराव देशमुख, संतोष गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. निवेदन संजय घोडके यांनी केले.

# वागदरी जि.प. गटातील बूथ अध्यक्ष व बूथ समितीची बैठक

## खासदार इरण्णा कडाडी यांनी घेतला बूथ प्रमुखाचा आढावा

अक्कलकोट/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे सोलापूर जिल्हा पूर्वचे प्रभारी खासदार इरण्णा कडाडी तसेच अक्कलकोट विधानसभाचे प्रभारी चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील वागदरी जि.प. गटातील गावातील बूथ अध्यक्ष व बूथ समितीची बैठक झाली.

सांगवी, शिरवळ, शिरवळवाडी, वागदरी, गोगाव, खैराट, भुरीकवठा येथील निवडणुकीच्या तयारीबाबत विविध विषयावर चर्चा झाली.

यावेळी अक्कलकोट भाजप तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, विधानसभा निवडणूकप्रमुख राजकुमार झिंगाडे, विधानसभा संयोजक प्रदीप पाटील सोलापूर मध्यचे प्रभारी उदयशंकर पाटील, बाळासाहेब भोसले, बकर शेख, आप्पासाहेब बिराजदार , हणमंत घोदे, बसवराज शेळके , शाणप्पा मंगाणे, धोंडाप्पा यमाजी, बसवराज पाटील, राजकुमार मंगाणे, संतोष पोमाजी, प्रकाश पोमाजी, महादेव सोनकवडे, शारदा रोटे, जयश्री बटगेरी, प्रदीप जगताप, कमलाकर सोनकांबळे, सिद्धाराम मठपती, सचिन युगरे, श्रीमंत कुंटोजी, मल्लिनाथ शिदोरे व भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



अक्कलकोट : बूथ प्रमुखांच्या बैठकीत खा. इरण्णा कडाडी, चंद्रकांत पाटील यांच्यासह पदाधिकारी.

# नवरात्रोत्सवात शांतता, सुव्यवस्था राखावी

## उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड यांचे मंडळांना आवाहन

मंगळवेढा/प्रतिनिधी

नवरात्रोत्सव काळात शांतता व सुव्यवस्था राखावी यासाठी पोलिस प्रशासन सज्ज आहे. मंगळवेढयात २२ नवरात्र महोत्सव मंडळे आहेत. या मंडळांना पोलिस संरक्षण पुरविण्याची आमची जबाबदारी आहे. पोलिसांना सहकार्य करणे हे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे काम आहे, असे उद्गार उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड यांनी काढले.



मंगळवेढा : शांतता कमिटीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना पोलिस अधिकारी.

मंगळवेढा येथे गुरुवार (दि. ३)पासून नवरात्र उत्सव पार पडणार आहे. यासाठी शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन मंगळवेढा पोलिस स्टेशन येथे सोमवारी (दि.३०) केले होते, त्यात ते बोलत होते. पोलिस निरिक्षक महेश ढवाण म्हणाले, उत्साहाला कुठेही गालबोट लागू नये यासाठी मंडळातील प्रत्येक पदाधिकाऱ्याची शांतता सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे. प्रत्येक मंडळाला दोन पोलिसांचा बंदोबस्त दिला जाईल. काही अनूचित घटना घडल्यास संबंधित पोलिसांना ताबडतोब माहिती द्यावी. त्या मंडळाचे नवरात्र महोत्सव काळात ते पालक म्हणून काम करतील. मिरवणूकीसाठी मात्र वेगळा बंदोबस्त दिला जाईल. प्रत्येक मंडळाने दोन गाणी प्रत्येक चौकामध्ये लावावीत. व पाठीमागून येणाऱ्या मंडळाला सहकार्य करावे. व्यसनाधिन व्यक्तींचा तसेच पुंगळी बहाद्दरांचा समाचार घेतला जाणार आहे.

महावितरणचे सहाय्यक अभियंता अमर कांबळे यांनी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची आम्ही काळजी घेणार असल्याचे आश्वासन दिले. शांतता कमिटी बैठकीसाठी माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मण ढोबळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक अंकुश वाघमोडे, जयभवानी नवरात्र मंडळाचे अध्यक्ष यादवराव आवळेकर, युवराज कलुबर्मे, ॲड.रमेश जोशी, विजय खवतोडे, फिरोज मुलाणी, दत्तात्रय सावंत, नारायण गोवे, ॲड. संभाजी घुले, ज्ञानेश्वर कोंडूभैरी, ॲड. रविकिरण कोळेकर, राजवीर हजारे, दत्तात्रय भोसले यांच्यासह मंडळ

# माढा मतदारसंघाच्या विकासासाठी साथ द्या

## धनराज शिंदे; पालवण येथे उत्साहात स्वागत

माढा/प्रतिनिधी

माढा विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी माढा विधानसभा मतदारसंघातील जनतेने साथ द्यावी असे आवाहन माढा वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष धनराज शिंदे यांनी केले.


पालवण (ता.माढा) गाव भेट दौरा प्रसंगी ते बोलत होते. त्यांचे गावात मोठ्या उत्साहात जेसीबीतून फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आले. माढा तालुक्यात अनेक प्रलंबित प्रश्न असून गावागावांना जोडणारे रस्ते असतील,वाड्या वस्तीवरील रस्ते, सरकारी दवाखाने, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा, त्याचबरोबर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची दुरावस्था अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण माढा विधानसभा मतदारसंघाची निवडणूक लढवत आहे. जनतेने साथ दिली तर माढा विधानसभा मतदारसंघ विकासाचे मॉडेल बनवू असे प्रतिपादन त्यांनी केले.



माढा : पालवणमध्ये धनराज शिंदे यांच्यावर जेसीबीतून पुष्पवृष्टी करण्यात आली.

यावेळी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भारत साळुंखे, उपसरपंच किरण क्षीरसागर, संतोष पवार, प्रविण वारंजे, अजित पवार, शंकर साळुंखे, हनुमंत साळुंखे, सुसेन रणदिवे, प्रदिप करंडे, सोमनाथ पवार, रणजीत क्षीरसागर, सागर रणदिवे, ज्ञानेश्वर करंडे, युवराज साळुंखे, रोहित ओहोळ, किरण ओहोळ, तेजस ओहोळ, रोहित मदने, बाबुराव साळुंखे, युवराज क्षीरसागर, आकाश साळुंखे, तानाजी साळुंखे, नागेश साळुंखे, राम करंडे आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



नातेपुते : डॉ. गौतम बेंगळे यांचा सन्मान करताना नाथाजीराव देशमुख व अन्य मान्यवर.

### डॉ. गौतम बेंगळे यांचा सन्मान

**नातेपुते :** जगाला अहिंसा, शांती, बंधुता, समता आणि मानवतेचा संदेश देणारे गौतम बुद्ध यांच्या नावाने पुणे जिल्ह्यातील घेरा पुरंदर येथे लॉर्ड बुद्धा आंतरराष्ट्रीय विद्यापीठ निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असणारे डॉ. गौतम बेंगळे यांचा नातेपुते येथे कृती समितीचे संयोजक नाथाजीराव देशमुख यांनी सन्मान केला. ते अकलूजला राष्ट्रवादी पक्षाचे शरद पवार यांना निवेदन देण्यासाठी आले होते. यावेळी सहसंयोजक डॉ.संभाजी बनसोडे, धनाजी देशमुख, मिलिंदकुमार रणदिवे, विनायक भालेराव, रमेश बागले, वासुदेव माळी, दिनकर चंदनशिवे हे उपस्थित होते.



परंडा : सुजितसिंह ठाकूर यांचा सत्कार करताना ॲड. दत्तात्रय सुर्यवंशी, कार्याध्यक्ष ॲड. जहीर चौधरी आदी.

### सुजितसिंह ठाकूर यांचा परंडा बार असोसिएशनतर्फे सत्कार

**परंडा :** भाजपचे विधानपरिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांना महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवी कार्यक्रमात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते विधानपरिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात आला. त्याबद्दल परंडा बार असोसिएशनच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी परंडा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. दत्तात्रय सुर्यवंशी, कार्याध्यक्ष ॲड. जहीर चौधरी, सचिव ॲड. सुनील शिंदे, जेष्ठ विधीज्ञ ॲड. दादासाहेब खरसडे, ॲड. गणेश खरसडे, ॲड. संतोष सुर्यवंशी,ॲड. सुजित देवकते, ॲड. श्रीकांत भालेराव, ॲड. विवेक काळे तसेच सर्व बार असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिंहगडमध्ये 'जनरेटिव ए आय' विषयावर व्याख्यान

**पंढरपूर :** कोर्टी (ता. पंढरपूर) येथील एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये जनरेटिव ए. आय. या विषयावर शनिवारी (दि. २८) व्याख्यान झाल्याचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी सांगितले. कार्यशाळेत रूपेश रनवरे यांनी मार्गदर्शन केले. ते नॉलेज बेस कन्सल्टंट (टेक्निकल), पुणे येथे कार्यरत आहेत.कार्यशाळेसाठी ७५ हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सुमित इंगोले यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. पुनम गवळी यांनी केले.

### प्रताप क्रीडा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा

**अकलूज :** प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर- अकलूजची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते पाटील व रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन जेष्ठ संचालक वसंत जाधव यांच्या हस्ते व अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, स. म साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर चौगुले, उपाध्यक्ष पोपट भोसले पाटील या मान्यवरांचे उपस्थितीत झाले. स्वागत व इतिवृत्त वाचन सचिव बिभीषण जाधव यांनी केले. सहा विषयांना मंजुरी दिली. अध्यक्षीय मनोगतामध्ये स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी रत्नप्रभादेवी मोहिते पाटील जन्मशताब्दी, जयसिंह मोहिते-पाटील आणि मदनसिंह मोहिते-पाटील यांचे अमृत महोत्सवी वाढदिवस निमित्त वार्षिक स्पर्धा व उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. सभेस मंडळाचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राजकुमार पाटील यांनी केले. संचालक बाळासाहेब सावंत यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदानाची प्रतिक्षा

## पिलीव परिसरातील समस्या; वर्षानंतरही मिळेनात पैसे

**पिलीव/प्रतिनिधी**

गतवर्षी सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात पाऊस न झाल्यामुळे खरीप हंगाम पुर्णपणे वाया गेला होता. सरकारने पाहणी केल्यानंतर दुष्काळी अनुदानाची घोषणा केली होती. मात्र पिलीव परिसरात अनेक शेतकऱ्यांना अद्यापही त्या अनुदानाची प्रतिक्षाच आहे.

दुष्काळानंतर केंद्रीय पथकाने केलेल्या पाहणी नंतर माळशिरस तालुक्याचा दुष्काळी तालुक्यात समावेश केला होता. २०२३ मध्ये पाऊस न पडल्यामुळे पूर्ण खरीप हंगाम वाया गेला होता. यासाठी शासनाने शेतकऱ्यांना मदत म्हणून दुष्काळी अनुदान जाहीर केले होते. तलाठी कार्यालयाने आवश्यक ती कागदपत्रे घेऊन त्याच्या याद्या तयार करून त्या याद्या तहसील कार्यालयात जमा केल्यानंतर महिनाभरानंतर तालुक्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना दोन टप्प्यात निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर केवायसी केल्यावर जमा झाला. यामध्ये काही अडचणी म्हणजेच केवायसी न झाल्यामुळे किंवा खातेदार मयत झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना सदरचा निधी मिळाला नाही. पण, केवायसी करुन किंवा सर्व कागदपत्रांची पूर्तता करुनही तालुक्यातील ७००० च्या आसपास शेतकऱ्यांना अदयापही शासनाकडून दुष्काळी मदत निधी मिळालाच नाही.

याबाबत सदरचे शेतकरी वारंवार तहसील कार्यालयात किंवा तलाठी कार्यालयाकडे विचारणा करीत आहेत. पण या कार्यालयाकडून आम्ही सर्व प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

शासनाकडूनच सदरचा निधी प्राप्त नाही आम्ही याबाबत वरील कार्यालयाकडे सतत पाठपुरावा करीत आहोत. वरुनच हा निधी तुम्हाला मिळेल अशी उत्तरे प्रशासन देत आहे. इतर सर्व शेतकऱ्यांना दुष्काळी निधी मिळाला आहे पण तालुक्यातील २० टक्के शेतकऱ्यांना सदरचा निधी मिळाला नाही. यामुळे या शेतकऱ्यांमध्ये उलट सुलट चर्चा सुरु असून आम्हाला सदरचा निधी मिळतो की नाही याची काही खात्री वाटत नाही, अशी चर्चा ऐकावयास मिळत आहे.

यामुळे शासनाविषयी या शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते यांच्यामुळेच माळशिरस तालुक्याचा दुष्काळी तालुक्यात समावेश झाला होता. त्यांनीच राहिलेल्या शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान मिळवुन दयावे अशी तालुक्यातील शेतकऱ्यांनची भावना आहे.

आता लवकरच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे बिगूल वाजणार आहे. कधीही आचारसंहिता लागु शकते, त्या अगोदरच हा दुष्काळी अनुदान मिळणे अपेक्षित आहे. नंतर कोणते सरकार सत्तेत येते याची शाश्वती नाही.

> शासनाने शेतकऱ्यांना दुष्काळी मदत म्हणून निधी जाहीर केला. अनेक शेतकऱ्यांना तो निधी मिळाला पण बोटावर मोजण्याएवढे शेतकरी यापासुन वंचित आहेत. शासनाने ताबडतोब या शेतकऱ्यांना दुषकाळी अनुदान द्यावे.
>
> **- तानाजी शेंडगे, शेतकरी, कुसमोड.**

> तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान मिळाले नाही याबाबत आम्ही वरिषठांना कळविले आहे, आमच्याकडील सर्व बाबीची पूर्तता केली आहे शासनस्तरावरुन निधी उपलब्ध होताच राहिलेल्या शेतकऱ्यांना तो निधी मिळेल.
>
> **- अमोल कदम, नायब तहसीलदार, माळशिरस.**

# बाजारभावापेक्षा दुप्पट दराने विकली स्वीट कॉर्न

## राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसरचा करार शेतीचा यशस्वी प्रयोग




करमाळा : मका पोत्यात भरुन विक्रीसाठी धाडताना शेतकरी.

> रब्बी हंगामात किमान ५० एकर लागवड गावात होईल. खरीप हंगामात १५ एकरवर केलेला स्वीट कॉर्न मक्याचा प्रयोग यशस्वी झाल्याने आमच्या शेतकरी गटाबरोबरच गावातील इतर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढलेला आहे.
>
> **- गणेश माने,** शेलगाव क कृषी क्रांती शेतकरी गट.

**करमाळा/प्रतिनिधी**

शेलगाव कृषीक्रांती शेतकरी गटाने राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीच्या मदतीने सह्याद्री फार्मर कंपनी नाशिक यांच्याबरोबर स्वीट कॉर्न मकेचा करार करून ३ दिवसात ३० टन मका पाठवली. या मक्याला बाजारभावापेक्षा दुप्पट भाव मिळाला.

सामूहिक शेतीमुळे खर्चही कमी झाला आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले. करार शेतीचा राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीचा प्रयोग यशस्वी झाला असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या शेलगाव कृषीक्रांती शेतकरी गटातील सर्व सदस्यांनी स्वीट कॉर्न मका हे दुसरे पीक निवडले. ७० दिवसात ७००००/- हे सूत्र डोळ्यासमोर ठेवून त्यांनी स्वीट कॉर्न मक्याची लागवड जुलै २०२४ मध्ये केली. २० सप्टेंबरनंतर स्वीट कॉर्न मक्याचे हार्वेस्टिंग झाले. बाजारात ६ ते ७ रुपये प्रति किलो हा दर असताना सह्याद्री फार्मर कंपनीने १३ रुपये प्रति किलो दर दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकचे पैसे मिळाले. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे ११ रुपये प्रति किलो दराने करार ठरलेला असूनही प्रत्यक्षात त्यापेक्षा अधिक दर सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीने दिल्यामुळे करमाळा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना स्वीट कॉर्न मक्याची लागवड करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.




उत्तर सोलापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा पुजन प्रसंगी शामसुंदर गायकवाड, नानासाहेब गायकवाड, विठ्ठल वाघमारे आदी मान्यवर.

# उत्तरमधील दोनशे कार्यकर्ते साताऱ्याला जाणार : गायकवाड

**उत्तर सोलापूर/प्रतिनिधी**

रिपाइं (आठवले पक्ष) चा ६७ वा वर्धापनदिन सोहळा ३ ऑक्टोबर रोजी साताऱ्यात होणार आहे. उत्तर तालुक्यातील ३६ गावातून २०० हुन अधिक कार्यकर्ते येणार असल्याची माहिती जिल्हा सरचिटणीस शामसुंदर गायकवाड यांनी दिली आहे.

रिपाइं आठवले पक्ष उत्तर सोलापूर तालुका कार्यकारणींची बैठक सिध्दार्थ सार्वजनिक वाचनालय भीमनगर वडाळा येथे झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बैठकीस सुरुवात केली.

यावेळी उत्तर सोलापूर तालुक्याचे निरीक्षक विठ्ठल क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस शामसुंदर गायकवाड, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विठ्ठल वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संजय गवळी,सुभाष गायकवाड, बाबासाहेब जगताप, नानासाहेब गायकवाड, राजहंस गायकवाड, अमोल गायकवाड, आप्पा सरवदे, विवेक क्षीरसागर, नामदेव कसबे, अविनाश थोरात, सर्वगोड उपस्थित होते.

# सकारात्मक विचार हाच आनंदी जगण्याचा मूलमंत्र

## जयसिंह मोहिते-पाटील यांचे प्रतिपादन



**अकलूज/प्रतिनिधी**

जीवनात सकारात्मक विचार केला तर माणसांना नवीन जीवन जगण्याची उर्जा मिळते, असे उद्गगार जयसिंह मोहिते-पाटील यांनी सुमित्रा पतसंस्थेच्या ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत काढले. माणूस सकारात्मक विचारांमुळे आयुष्यभर आनंदी रहातो. प्रत्येकाने नकारात्मक विचार न करता सदैव सकारात्मक चांगले विचार अमलात आणले तर जीवन सुखकारक होऊन जाईल. माझ्या जीवनाच्या प्रवासात मी सदैव चांगलेच कार्य करत राहिल्यामुळे आज मी वयाच्या ७५ व्या वर्षीही सतत उत्साही व आनंदी राहिलो आहे, असेही ते पुढे म्हणाले.

यावेळी सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, दिपक खराडे-पाटील, सुभाष दळवी, अशोक जावळे, विजय शिंदे, नारायण फुले, विलास भरते, विशाल फुले, अभिजीत रणवरे आदी उपस्थित होते.

दूरदृष्टीचे नेते जयसिंह मोहिते-पाटील यांच्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्ता ग्रामपंचायतीचा सदस्य, सरपंच, पंचायत समितीचा सदस्य, सभापती, जिल्हा परिषदेचा सदस्य, आमदार, खासदार, सहकारी संस्थेचे संचालक झालेले आहेत, असे प्रतिपादन सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे यांनी केले.

# मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे उद्या पुरस्कार वितरण

**मोहोळ/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या सोलापूर जिल्हा शाखेच्यावतीने राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय उपक्रमशील शिक्षक व उपक्रमशील शाळांना पुरस्काराचे वितरण बुधवारी (दि. २) होणार आहे.

घाटूळे मंगल कार्यालय, कुरुल रोड, मोहोळ येथे सोहळा होणार असल्याची माहिती संघटनेचे राज्य अध्यक्ष शाम जवंजाळ यांनी दिली. राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमत जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, सोलापूर शहरातील महानगरपालिका शिक्षक व शाळांचाही समावेश आहे. एकूण प्रकारची संख्या १०५ असून राज्यातील एकूण १०५ शिक्षक व शाळा पुरस्काराने सन्मानित होणार आहेत

कार्यक्रमास खा. प्रणिती शिंदे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील , माजी आ. दिलीप माने, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील, उद्योजक राजू खरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, विजयराज डोंगरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, शिक्षण अधिकारी प्रदीप मोरे, रमेश बारसकर, बालाजी माने, दीपक गायकवाड, चरण चौरे, संतोष पाटील, संभाजी भडकुंबे आदींची उपस्थिती असणार आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष शशिकांत खुडे यांनीही ही माहिती दिली.

यावेळी निवड समिती अध्यक्ष बाळासाहेब कारंडे, माध्यमिक जिल्हाध्यक्ष सुदर्शन वराडे, माध्यमिक जिल्हा सचिव मारुती बेलभंडारे , प्राथमिक जिल्हा सचिव किरण सगेल, मनपा अध्यक्ष नागेश गोसावी, अशोक धोत्रे, मोहोळ तालुकाध्यक्ष सत्यवान खंदारे ,कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर लांबतुरे आदी उपस्थित होते.



कुर्डुवाडी : शिक्षक भारती संघटनेच्या नुतन निवडीनंतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पदाधिकारी व सभासद.

# शिक्षक भारती संघटनेच्या माढा तालुकाध्यक्षपदी संतोष आटोळे

## उपाध्यक्षपदी उल्हास उबाळे, सचिवपदी सचिन भोंग

**कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

शिक्षक भारती संघटना माढा तालुकाध्यक्षपदी संतोष आटोळे, तर उपाध्यक्षपदी उल्हास उबाळे यांची निवड करण्यात आली. तालुका कार्यकारिणीची जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे आणि जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली. त्यात या निवडी केल्या. सचिन भोंग यांची तालुका सचिव व प्रवीण जाधव यांची तालुका संघटकपदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीमध्ये माढा तालुका नूतन कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे, जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड, शहराध्यक्ष देवदत्त मेटकरी, उपाध्यक्ष आत्तार, जिल्हा संघटक शरद पवार यांनी सर्व नूतन माढा तालुका पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. याप्रसंगी शिक्षक भारती संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांनी माढा तालुका नूतन कार्यकारणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. आभार सचिन भोंग यांनी मानले.

# हमी भावापेक्षा कमी दरात सोयाबीन खरेदी

## आडत व्यापारी सरकारच्या हमी भावाला जुमेनात



संग्रहित छायाचित्र

> अचानक १०५ रुपये किलो असलेले तेल आज १४५ रुपये किलोने घ्यावे लागत आहे. भाववाढीमुळे महिला वर्गामध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.
>
> **-नसरीन शेख, गृहिणी.**

> मागील दहा दिवसांमध्ये १०५ रुपयांचे तेल १४५ रुपये झाले. मग शेतकऱ्यांच्या सोयाबीनला फक्त चार हजार रुपये भाव का ?
>
> **-सिद्धेश्वर पैसेकरी, शेतकरी, कळमण.**

> शासनाने ठरवून दिलेला ४८९२ रुपये हमीभाव हा शासनाने हमीभाव केंद्र काढून त्यांच्यामार्फत द्यावा.
>
> **-अरुण गिर्याम, व्यापारी, वैराग.**

**कळमन/प्रतिनिधी**

शेतकऱ्याचे सोयाबीनची काढणी सुरु आहे. अशावेळी बार्शी, वैराग बाजारसमितीत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात माल आणणे सुरु केले आहे. मात्र त्यांना व्यापाऱ्यांकडून हमीभावाने सोयाबीन खरेदी केली जात नाहीय. परिणामी त्यांच्यात निराशा आहे.

बहुतांश शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे अतिवृष्टीत नुकसान झाले आहे. उरलेली सोयबीन लवकर काढून बाजारात नेण्यासाठी घाई असताना मजूर वर्ग एकरी आठ हजार रुपयेप्रमाणे मागणी करत आहे. तरीही आपल्याला राहिलेले रान मोकळ होईल असं समजून शेतकरी सोयाबीन पीक काढून घेत आहे. परंतु बार्शी येथील अडत व्यापारी सोयाबीनला प्रतिक्विंटल ३८०० ते चार हजार रुपये एवढाच दर देत आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या ४९४२ रुपयांच्या हमीभावापेक्षाही फार कमी भावाने खरेदी करत आहेत. परिणामी शेतकऱ्यांमध्ये सरकारविरोधात नाराजी वाढत आहे. जो व्यापारी कमी भावाने सोयाबीन घेत आहे, त्याच्या दुकानावर कारवाई करावी व त्याचे लायसन बंद करावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

शासनाने हमीभाव ठरवून दिलेल्या असताना कमी भावोन खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना सरकार जाब का विचारत नाही? शासन मूग गळून का गप्प असाही प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात आयोजित कार्यक्रमात जमलेले भाविक.

### प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर :** सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात गुरु यशोदामाई इनामदार यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले. प्रारंभी सकाळी श्री गुरुगीता पारायणाची समाप्ती झाली. यानंतर दुपारी १२ वाजेपर्यंत सांप्रदायिक भजनाचा कार्यक्रम झाला. यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यानंतर दुपारी ठीक १२ वाजता मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांच्या उपस्थितीत गुलाल अर्पण करण्यात आला. गुलालानंतर भाविकांना प्रसादाचे वाटपही करण्यात आले. प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वामन वाघचौरे, वसंत बंडगर, कार्यकारणी मंडळ सदस्य इंद्रायणी कुलकर्णी, रमेश देशमुख, रामभाऊ कटकधोंड, सुभाष बद्रूकर, सम्राट राऊत, रवी गुंड, व्यवस्थापक निरंजन दंत काळे अधिक उपस्थित होते.

---

### ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आज जिल्हास्तरीय मेळावा

**सोलापूर :** राज्यात १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानूसार ज्येष्ठ नागरिकांसाठी मंगळवार दि. १ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता द्वारकाधीश मंदिर, जुळे सालापुर यथे जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी मेळाव्यास जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, उपस्थित रहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी केले आहे. ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या प्रकारे घालविता यावा. तसेच समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे. वृध्दापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळविण्यासाठी राज्याच्या सर्वसमावेशक धोरणानूसार १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय सोलापूर व चौधरी फोडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे सोनवणे यांनी सांगितले.

---

### लोकशाही दिनाचे ७ ऑक्टोबरला आयोजन

**सोलापूर :** जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

---

### अल्पसंख्यंक आयोगाच्या तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यपदी पराग शहा



**सोलापूर :** उद्योजक पराग शहा यांची महाराष्ट्र राज्यासंबंधित अल्पसंख्यंक समुदायाच्या समस्यांनिवारणासाठी राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोगाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. भारत सरकार अल्पसंख्यंक वाणिज्य मंत्रालय, राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोग सदस्य धन्यकुमार जिनाप्पा गुंडे यांच्या शिफारसीने श्री पराग शहा यांची ही नेमणूक झाली आहे. निवडीबद्दल खा. प्रणिती शिंदे, वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांच्यासह जैन समुदायातून पराग शहा यांचे अभिनंदन होत आहे.

# विठ्ठल कारखान्याची येत्या हंगामात ३५०३ रुपये पहिली उचल

**पंढरपूर/प्रतिनिधी**




पंढरपूर : विठ्ठल कारखान्याच्या सभेत बोलताना चेअरमन अभिजित पाटील. व्यासपिठावर संचालक मंडळ.

चालू हंगामात येणाऱ्या उसास आपण ३५०० रुपये दर जाहीर केला होता. त्यानंतर एका कारखान्याने १ रुपये जादा देऊ अशी मोघम घोषणा केली. त्यापेक्षा दोन रूपये आपण जादा देत ३५०३ रुपये पहिली उचल देऊ असे प्रतिआव्हान विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांनी विरोधकांना दिले.

विठ्ठल सह. साखर कारखान्याची अधिमंडळाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २९ रोजी कारखाना कार्यस्थळावर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. कारखान्याचे कार्यकारी संचालक प्रा. तुकाराम मस्के यांनी स्वागत केले. कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री डी.आर. गायकवाड यांनी श्रध्दाजंलीचा ठराव मांडला. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक, आर.बी. पाटील यांनी विषय पत्रीकेवरील विषयांचे वाचन केले. या सर्व विषयांना सभासदांनी आवाजी मतांनी व हात उंचावून मंजुरी दिली.

अभिजित पाटील पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या कष्टाने पिकविलेल्या ऊसाला जादा दर मिळावा ही अपेक्षा आहे. मागील गळीत हंगामात आपण जादा दर दिल्याने सोलापूर विभागातील शेतकऱ्यांना ६०० कोटींपेक्षा अधिकचा लाभ झाला. विभागातील सर्व कारखान्यात झालेल्या २१२ लाख मे.टन गाळपाला ३०० ते ४०० रुपये प्रति टन अधिकचा दर देण्याची वेळ आली. सुमारे ६०० ते ७०० कोटी रुपये जादाचे मिळाल्यामुळे विभागातील सर्व शेतकरी आज आशिर्वाद देत आहेत. विठ्ठलच्या सभासदांनी संधी दिल्यामुळे हे शक्य झाले आणि त्यामुळे खऱ्या अर्थान विठ्ठलचा सभासद जिंकला. केंद्र सरकारने साखरेवरील निर्यात बंदी उठवावी व साखरेची किमान आधारभुत किंमत रु.३८५०/- करावी, असे दोन ठराव सभेमध्ये मंजूर करुन केंद्र व राज्य शासनास पाठविण्यात यावे, याकरिता सर्व उपस्थित सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

## अभिजीत पाटील यांची माहिती

### कारखाना जादा दर देऊन विक्रम करेल

वेळप्रसंगी व्यक्तीगत राजकिय महत्वकांक्षा बाजुला ठेवून, जोखीम पत्कारून विठ्ठलच्या सभासदांचे हित अगोदर पाहिले. व्यक्तिगत पद, अधिकार यापेक्षा सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जावू दिला नाही. मतदार संघात प्रचंड राजकिय उलथापालथ झाली, पण आपला कारखाना ८००० मे. टनावरून १४००० मे. टन क्षमतेने येणारा हंगाम सुरु करेल. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळप करून व ३५००/- रुपये दर देवून नवा विक्रम प्रस्थापित करेल, असेही पाटील म्हणाले.

### कारखान्याचे कार्यक्षेत्र वाढविणे गरजेचे

आपल्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रालगत असलेल्या गावामधून आपले कारखान्यास ऊस गाळपास येत असून त्या गावातील शेतकऱ्यांची सभासद करुन घेणे व त्यांचे गावांचा समावेश कारखाना कार्यक्षेत्रामध्ये करून घ्यावा म्हणून वेळोवळी मागणी होत आहे. त्यामुळे त्यांना सभासद केल्यास कारखान्याच्या भांडवलामध्येही वाढ होऊन कारखान्यास आर्थिक फायदा होणार आहे. त्यातूनच इथेनॉल प्रकल्पाची उभारणी करणेसही मदत होईल, त्यामुळे कारखान्याचे कार्यक्षेत्र वाढविणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगीतले.

# पीक नुकसानाची माहिती ७२ तासात विमा कंपनीस कळवा

## कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी**



जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत परतीच्या पावसामुळे शेतीपिकाचे नुकसान झालेचे निदर्शनास आलेले आहे. पिकाचे नुकसान झालेले असल्यास विमा संरक्षित क्षेत्राला नुकसान भरपाई मिळणेसाठी झालेल्या नुकसानीची पुर्वसुचना संबंधीत विमा कंपनीस ७२ तासामध्ये कळवावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२४ या हंगामाकरीता अधिसुचीत क्षेत्रातील अधिसुचीत पिकांसाठी राबविण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी खरीप २०२४ मध्ये ओरियंटल इन्सुरन्स कंपनी लिमिटेड या विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पिक विमा योजनेतर्गत खरीप २०२४ मध्ये जिल्ह्यातील ७ लाख ३३ हजार ३०३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला आहे प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेती क्षेत्राचे नुकसान झाल्यास विमा कंपनीकडे नुकसान भरपाई दावा दाखल करता येतो. विमा दावा मंजूर होण्यासाठी झालेल्या पीक नुकसानीची माहिती, पुर्वसुचना कंपनीस देणे गरजेचे आहे. नुकसानीबाबतची सुचना पिक विमा कंपनीकडे नोंद करण्यासाठी पिक विमा प अथवा कृषि रक्षक पोर्टल टोल फ्री क्रमांक १४४४७ या क्रमांकाचा वापर करावा, तसेच याबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास विमा कंपनीचे तालुकास्तरावरील प्रतिनिधी, बँक व तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे संपर्क करावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# संधी दिल्यास पुन्हा लढू; जर इतरांना संधी दिल्यास निवडून आणू : आ.सुभाष देशमुख

**सोलापूर/प्रतिनिधी**



भाजपा पक्षाने मला विविध पदावर काम करण्याची संधी दिलेली आहे. भाजपामुळे मी खासदार, आमदार, मंत्री होण्याच्याही मान मला मिळाली आहे. पक्षाने पुन्हा एकदा संधी दिल्यास निवडणूक लढवू जर इतर कोणालाही उमेदवारी दिल्यास प्रामाणिकपणे त्यांच्या पाठीमागे उभे राहून निवडून आणू असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

होटगी येथे झालेल्या पत्रकारपरिषद मध्ये आमदार सुभाष देशमुख बोलत होते. या पत्रकार परिषदेत भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, अतुल गायकवाड आदी होते. १९९८ पासून मी राजकारणात सक्रिय असून गेली २८ वर्षे भाजप पक्षात एकनिष्ठ राहून एक जनतेचा सेवक म्हणून काम करत आहे. प्रत्येकवेळ पक्षाने दिलेला आदेश मानला आहे. विमानसेवा चालू करण्यास काही टेक्निकल अडचणी होत्या. त्या आता सर्व दूर झाल्या आहेत. करार आणि सर्व्हे केल्यानंतर लवकरच विमान उड्डाण होईल. दक्षिण मतदार संघात गेल्या २५ वर्षात कोणी निधी आणला नाही तेवढा निधी १० वर्षात आणला आहे, असेही ते म्हणाले.

### दंगलीचा कलंक तुम्हीच लावला

काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी पद्मशाली समाजाच्या मेळाव्यात भाजपवर दंगली घडविल्याचा आरोप केला होता. त्यावर आ. देशमुख म्हणाले, केंद्रामध्ये मागील दहा वर्षापासून केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता आहे. त्यावेळी सोलापूर अथवा महाराष्ट्रात एकही दंगल झाली नाही. उलट मागे काँग्रेसची सत्ता असताना सोलापुरात दंगली झाल्या. त्यामुळे सोलापूर वर दंगलीचा कलंक तुम्हीच लावला असा थेट आरोप त्यांनी काँग्रेसवर केला.

# तेलुगू चित्रपटाची क्रेझ कायम
# 'देवरा'ला सिनेरसिकांचा प्रतिसाद

**सोलापूर/प्रतिनिधी**




सोलापूर : देवरा चित्रपट पाहण्यासाठी झालेली सिनेरसिकांची गर्दी.

सोलापूर शहरातील पूर्व भागात तेलगू समाजचे प्रमाण जास्त आहे. या भागात जवळपास ३ ते ४ थिएटर असून यामध्ये तेलगू भाषेतील नवीन चित्रपट आल्यास आजही तो शो हाऊसफुल्लच झाला. नुकताच ज्युनिएर एन.टी. रामारावचा देवरा चित्रपट आला असून त्याला सिनेरसिकांचा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आजच्या सोशल मिडीयाचा जमान्यातही तेलुगु चित्रपटाची क्रेझ कायम आहे.

आजच्या सोशल मिडीयाच्या जमान्यात मोबाईलवर सर्व चित्रपट झटपट पहावयास मिळतात. मात्र या सोशल मीडियाच्या जमान्यात आजही तेलुगु भाषेतील चित्रपट आल्यास पूर्व भागातील लक्ष्मी- नारायण टॉकिज पद्मा टॉकिज, श्रीनिवास टॉकिज येथे हे चित्रपट हाऊसफुल्ल जातात. प्रेक्षक आपल्या आवडीच्या हिरोची चित्रपट पहायला गर्दी करतात. कौटुंबिक चित्रपट असेल तर अगोदरच बुकिंग करण्यात येते. या भागात जास्तीत जास्त हे मजूर लोक राहतात. त्यांचा पगार ही आठवडयाला किंवा पंधरा दिवसाला होते. आठवडाभर कष्ट करून आलेला थकवा घालवण्यासाठी करमणुकीच्या माध्यमातून ते चित्रपट पहायला आजही गर्दी करतात. आपला हिरो, आपली मातृभाषा बोलून करमणूक करणाऱ्या अभिनेत्याला डोक्यावर घेतले जाते. हिरोच्या पोस्टरला हार घालून, फटाके फोडून जल्लोष करण्यात येतो. तसाच काही प्रत्यय ज्युनिएर एन.टी. रामारावच्या देवरा चित्रपटाबाबत दिसून आला.

> आज चित्रपट उद्योग हा डबघाईस आला आहे.मोठी आर्थिक गुंतवणूक असली तरी तयार होणासाठी बराच कालावधी लागत आहे. जुने चित्रपट पहणाऱ्याची संख्या कमी आहे. त्यामुळे नवीन पिक्चरची वाट पहावी लागते.हिंदी चित्रपटापेक्षा तेलुगु चित्रपटाला जास्त गर्दी असते.
>
> **-सुजित कोंडा व्यवस्थापक लक्ष्मीनारायण टॉकीज**
>
> आमचा हिरोचा पहायला आम्ही येतो. तेलुगु सिनेमाची स्टोरी हिंदी चित्रपटापेक्षा चांगली असते. आम्ही सर्व जण मिळून पहातो. चित्रपट पाहण्यास आल्यावर आम्हाला आमच्या गावातील माणसांची भेट झाल्यासारखे वाटते.
>
> **-विशाल पेद्दललू, प्रेक्षक**

# गुजराती मित्र मंडळ महिला विभागाच्या अध्यक्षपदी शहा; सचिवपदी बक्षी



Priti Shah | Kavita Patel | Arpita Baxi | Jyoti Dedhia | Seema Gandhi

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर गुजराती मित्र मंडळाच्या महिला विभागाची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी प्रीती कौशिक शहा आणि सचिवपदी अर्पिता प्रणव बक्षी यांची निवड जाहीर करण्यात आली.

गुजराती मंडळाचे सचिव जयेश पटेल यांनी २०२४ ते २०२६ या दोन वर्षांसाठी ही निवड असेल अशी घोषणा केली. इतर कार्यकारी सभासद पुढीलप्रमाणेः उपाध्यक्ष - कविता पटेल, सहसचिवा - ज्योती देढिया, खजिनदार - सीमा गांधी, माजी अध्यक्षा - पारुल पटेल, नीता दंड, वनिता पटेल, कलावती पटेल, संगीता मेहता, बिना पंचमिया, रिंता पटेल, भारती पटेल. महिला विभागाच्या समन्वयक म्हणून स्वाती देसाई आणि सल्लागार सदस्य म्हणून भारती पटेल, हसुमती जव्हेरी आणि इंदिरा पटेल यांची फेरनिवड झाली. नवनियुक्त सचिव अर्पिता बक्षी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी सोलापूर गुजराती मित्र मंडळाचे उपाध्यक्ष मणिकांत दंड, खजिनदार चिमन पटेल, सहसचिव संदीप जव्हेरी उपस्थित होते.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेला पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक पसंती

## जिल्ह्यातील १३ हजार ८१९ ग्राहकांची तब्बल १६ लाखांची बचत

**सोलापूर/प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्रातील पर्यावरणस्नेही १ लाख ९४ हजार ८९८ वीजग्राहकांनी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत पेपरलेस वीजबिलास राज्यात सर्वाधिक पसंती दिली आहे. यासाठी महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झाल्याने या ग्राहकांना वार्षिक २ कोटी ३३ लाख ८७ हजार ७६० रुपयांचा फायदा होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील १३ हजार ८१९ ग्राहकांना तब्बल १६ लाखांचा फायदा णाला आहे.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेनुसार छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिल व प्रतिमहिना १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक १२० रुपयांची बचत होत आहे. त्यानुसार वीजबिलांसाठी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत पश्चिम महाराष्ट्रातील तब्बल १ लाख ९४ हजार ८९८ पर्यावरणस्नेही वीजग्राहकांनी केवळ 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडला आहे. या योजनेत आतापर्यंत राज्यातील ४ लाख ८७ हजार ११३ वीजग्राहकांनी सहभाग घेतला आहे. त्यामध्ये सर्वाधिक ४० टक्के ग्राहक पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. तर पुणे परिमंडलातील १ लाख ३० हजार ७६१ ग्राहक राज्यात सर्वाधिक संख्येने या योजनेत सहभागी झाले आहेत.

### जिल्ह्यातील ग्राहक संख्या आणि झालेला फायदा

पुणे प्रादेशिक विभाग अंतर्गत 'गो-ग्रीन' योजनेमध्ये पुणे जिल्ह्यातील १ लाख ३९ हजार ८२२ ग्राहक सहभागी झाले आहेत त्यांना १ कोटी ६७ लाख ७८ हजार ६४० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. या योजनेतून सातारा जिल्ह्यातील १२ हजार ७९६ ग्राहकांचे १५ लाख ३५ हजार ५२० रुपये, सोलापूर जिल्ह्यातील १३ हजार ८१९ ग्राहकांचे १६ लाख ५८ हजार २८० रुपये, कोल्हापूर जिल्ह्यातील १७ हजार ५१५ ग्राहकांचे २१ लाख १ हजार ८०० रुपये आणि सांगली जिल्ह्यातील १० हजार ९४६ ग्राहकांच्या १३ लाख १३ हजार ५२० रुपयांचा वीजबिलामध्ये वार्षिक फायदा होत आहे.

### वीजबिल कधीही डाऊनलोड करता येणार

'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झालेल्या वीजग्राहकांना छापील वीजबिलांची गरज भासल्यास त्यांना ईमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येईल. सोबतच संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेचा पर्याय निवडण्यासाठी महावितरणचे मोबाईल ॲप किंवा ु.ारहरवळीलो.ळप संकेतस्थळ येथे सुविधा उपलब्ध आहे.







सोलापूर : शाळांना सॅनेटरी पॅड वेंडींग मशीन भेट देताना उद्योजक राम रेड्डी.

# बालाजी अमाईन्सतर्फे शाळांना सॅनेटरी पॅड वेंडींग मशीन भेट

**सोलापूर :** बालाजी अमाईन्सच्यावतीने सी.एस.आर अंर्तगत सोलापुरातील विश्वभूषण विद्यालय व धाराशिव जिल्हयातील वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय या शाळांना सॅनेटरी पॅड वेंडींग मशीन व इन्सीनेटर मशीन भेट देण्यात आले.

बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांच्या हस्ते बालाजी अमाईन्स येथील कार्यालयात या मशीन भेट देण्यात आली.

या दोन्ही शाळेत व महाविद्यालयात मुलींची संख्या जास्त असल्याने मुलींना त्या दिवसाच्या अडचणीत त्यांना शाळेत सॅनेटरी पॅड उपलब्ध व्हावेत, त्या करीता त्रास होऊ नये या करीता बालाजी अमाईन्सच्या सी एस आर अंर्तगत सॅनेटरी पॅड वेंडींग मशीन व इन्सीनेटर मशीन भेट देण्यात आली. या प्रसंगी व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी, तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार, मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे, रामचंद्र व्हनकडे, प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे, सदाशिव माने, गंभीरे, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. गंभीरे यांनी बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाचे व व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांचे आभार मानले.

CMYK